# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २९.९.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शनिवार दिनांक २९ सप्टेंबर २००७ रोजी मा.महापौर डॉ.भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे दुपारी ३.४५ वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त तसेच नगर सचिव यांचेसह संबंधीत अधिकारी च खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
०३. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०४. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०५. स.स.श्री.बमने पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१४. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१५. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१६. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१७. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन
१८. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१९. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
२०. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
२१. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२२. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२३. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२४. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२५. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
२६. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२७. स.स.श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन
२८. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
२९. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३०. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव

३१. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्यीन
३२. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
३३. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
३४. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
३५. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
३६. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
३७. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
३८. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
३९. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४०. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४१. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
४२. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
४३. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
४४. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
४५. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
४६. स.स.डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
४७. स.स.श्री.खुडे विजय किसन
४८. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
४९. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
५०. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५१. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
५२. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
५३. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
५४. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
५५. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
५६. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
५७. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
५८. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
५९. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६०. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६१. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
६२. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
६३. स.स.श्री.जोशी संजय रामदास
६४. स.स.सौ.रहाटकर विजया किशोर
६५. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
६६. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
६७. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
६८. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
६९. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७०. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
७१. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
७२. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०२. स.स.श्री.राजेश (पप्पु) गुलाबचंद व्यास
०३. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०४. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी

**चर्चा :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :तातडीने बैठक आयोजित केली ही सभा घेण्याची आवश्यकता नव्हती. वार्डातील नागरीकांसाठी विकास व्हावयाच्या दृष्टीने एकही महत्वाचा विषय नाही. जो एक नगर रचना विभागाचा विषय पत्रिकेवर विषय आहे तो पुढील महिन्याच्या सर्वसाधारण सभेत घेऊ शकलो असतो. संबंधीत अधिकारी सभेला उपस्थित नाही. आमच्या वार्डातील विकास कामाचे एकही टेंडर काढलेले नाही विकास कामे होत नाही. शिवाय रमजानचे उपवास चालू आहे. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विरोध आहे बैठक रद्द करावी.

श्री.सलीम खान : मला प्रशासनास माहिती विचारावयाची आहे.

मा.महापौर : विषय नसेल तरी चर्चा करावी यापुर्वी महिन्यातून दोन बैठका घेण्याचे जाहीर केलेले होते त्यामुळे आजची सभा आयोजित केलेली आहे.

श्री.सय्यद खुसरो : बजेट बुक होवून चार महिने झाले. कोणत्याही विकास कामास सुरूवात नाही. भडकल गेट जवळील नाल्यावरील ब्रीज तुटला तातडीने काम करण्याचे बोलले होते अद्याप टेंडर काढले नाही यास कोण जबाबदार आहे.

श्री.सलीम खान : चर्चेसाठी अगोदर वेळ दयावा.

मा.महापौर : चर्चेसाठी वेळ दिला जाईल अगोदर विषय पत्रिका घेण्यात येत आहे.

श्री.सलीम खान : रमजान महिना चालू आहे प्रशासनाने तसेच अग्निशमन विभागाने मिना बाजारसाठी एनओसी दिली नाही. दुजाभाव केला जातो. एनओसी देणार नाही लोक तेथे मिना बाजार भरविणार यास जबाबदार कोण असणार आहे.

मुख्य अग्निशमन अधि. : दर वर्षी जेथे मिना बाजार भरविला जातो. अग्निशमन विभागाने वेळोवेळी सुचना दिल्या त्याचे पालन होत नाही. मिना बाजार मध्ये कपडयाचे मोठमोठे दुकाने लागलेली असतात जर आग वगैरे लागल्यास तेथे या विभागाचे वाहन जावू शकत नाही. अशा वेळी अनेक लोक मृत्यूमुखी पडू शकतात. मागील वर्षी एका ठिकाणी ३७६ लोकांचा मृत्यू झालेला होता तशाच प्रकारची घटना येथे होवू शकते. पायी लोकांना चालता येत नाही अशा वेळी अग्निशमन विभागाचे वाहन तेथे जावू शकणार नाही अशी परिस्थिती असते. त्यामुळे एनओसी देण्याचे नाकारले आहे. यापूर्वी अग्निशमन दलाने केव्हाही मिना बाजार भरविण्यास एनओसी दिलेली नव्हती.

श्री.सलीम खान : यापूर्वी तेथे फटाका स्टॉल लागले जात होते.

मुख्य अग्निशमन अधि. : १९९१ पूर्वी शहरात अनेक वेगवेगळया ठिकाणी फटाक्याचे स्टॉल लागले जात होते. त्यावेळी सुध्दा परवानगी नाकारलेली होती. निराला बाजार जवळील मोकळया जागेत मिना बाजार भरविण्यास तयार असेल तर एनओसी देण्यास तयार आहे. गेल्या १५ वर्षात अग्निशमन दलाने एनओसी दिलेली नाही.

मा.महापौर : प्रशासनाने खुलासा करावा.

मा.आयुक्त : गेल्या १५ ते १६ वर्षापासून सदर ठिकाणी मिनाबाजार भरविला जात आहे परंतु तेथे अशी परिस्थिती आहे की जर काही दुर्घटना घडल्यास तेथे अग्निशमन दलाचे वाहन जावू शकत नाही. काही घटना घडल्यास अनेक लोकांचे प्राण जावू शकतात. आतापर्यंत घटना घडली नाही. मिनाबाजार बंद करण्याचे प्रशासनाचे मत नाही. परंतु

मोकळया जागेत जसे आमखास मैदान वर भरविण्याचे प्रयत्न करू यापुर्वीही अग्निशमन विभागाने एनओसी दिलेली नव्हती रिस्क घेवून परवानगी दिलेली होती. जास्तीत जास्त मोकळया जागेवर मिना बाजार भरण्यासाठी आपण प्रयत्न करू.

श्री.सलीम खान :परवानगी देणार नाही हे प्रशासनाने सहा महिन्यापुर्वीच जाहीर करावयास पाहिजे होते.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : मिना बाजार शहरात असावे योग्य अशा जागेवर भरविण्याची परवानगी द्यावी.

मा.आयुक्त : रस्त्यावर मार्केट बसू नये असे मा.न्यायालयाचे पण आदेश आहे. जेथे मोकळी जागा आहे अशा ठिकाणी भरविता येईल. बाजार बंद करणार नाही मोकळया जागेवर शिप्ट करण्याचे धोरण आहे.

श्री.सलीम खान : मा.न्यायालयाचे आदेश रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याचे होते परंतू ते न काढता आणखी अतिक्रमण होवून दिलेले आहे. मिनाबाजार साठी परवानगी न देणे योग्य नाही . मा.न्यायालयाचे आदेश शहरातील जालना रस्त्याच्या संदर्भात होते.

श्री.सय्यद खुसरो : मिना बाजारची जी कमेटी असेल त्यांना बोलवून आमखास मैदान वर भरविण्याची परवानगी द्यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : रोशनगेट जवळ मिलची जागा आहे तेथे परवानगी द्यावी.

मा.आयुक्त : काही घटना घडल्यास लोकांना लवकर बाहेर निघता आले पाहिजे अग्निशमन दलाची गाडी जायला पाहिजे अशा ठिकाणी प्रशासन परवानगी देईल. अमखास मैदान यासाठी उत्तम जागा आहे दुसरीकडे पर्यायी जागा असेल तर सुचवावे प्रशासन विचार करेल.

मा.महापौर : जेथे जागा मोठी असेल काही दुर्घटना झाल्यास अग्निशमन दलाचे वाहन जावू शकेल. जिवित हानी होणार नाही अशा ठिकाणची मोकळी जागा बघून प्रशासनाने या बाबतीत निर्णय घ्यावा. आमखास मैदान किंवा रोषन गेट भागात मोकळया जागेवर काळजी घेवून परवानगी द्यावी.

श्री.अ.रशिद खान :१९८८ मध्ये चौकात गडबड झाली म्हणून शहागंज मध्ये हा बाजार शिप्ट केला मी अध्यक्ष होतो. तेव्हा हे शहर लहान होते एका प्रकरणात दुर्घटना घडली. अग्निशमन अधिकाऱ्यांना मा.न्यायालयाने शिक्षा केलेली आहे. योग्य ती जागा बघून निर्णय घ्यावा. एका रस्त्यावर परवानगी द्यावी बाजूचा रस्ता मोकळा ठेवावा असे प्रयत्न केल्यास योग्य होईल. आमखास किंवा मोकळया ग्राऊंडवर जे की दुर्घटना घडल्यास अग्निशमन दलाचे वाहन जाईल.

**<u>विषय क्र. ११२५/०१ :</u>**

दिनांक २०.०९.२००७ च्या सर्वसाधारण सभेतील निर्णयाप्रमाणे.

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मौजे मिटमिटा येथील गट क्रमांक १११,११४,११७, मधील जमीनीतील १५ मीटर व ३० मीटर रुंद विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्रासाठी हित संबंधीतांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-१२७ अन्वये दिनांक १८.०५.२००७ रोजी खरेदी सूचना दिलेली आहे.

उक्त दिलेली खरेदी सूचना अन्वये बाधीत क्षेत्राकरीता रितसर भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १७.११.२००७ पूर्वी पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा सदरील आरक्षण व्यपगत होईल.

उक्त गट नंबर १११,११४ व ११७ मध्ये १५ मीटर व ३० मीटर रुंद विकास योजना रस्त्यामध्ये १.८५ हेक्टर क्षेत्र बाधीत होत आहे. अंदाजे मोबदला ६५ लाख होईल.

करीता वरील बाधीत क्षेत्राचा भूसंपादन प्रस्ताव त्यास येणा-या खर्चासह मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :पूर्वी हा विषय स्थगित ठेवला होता पुन्हा मंजुरीसाठी दिला. दोन रस्ते आहे जी जागा जात आहे त्याचे बाजूला कुणाची जागा आहे. लेआऊटचे फायदा त्यांना मिळेल का? की जमिनीचा लेआऊट पडणार आहे एकाच मालकाची आहे का? त्यांचेशी वाटाघाटी करून रस्त्यासाठी ॲडजेसमेंन्ट करू शकतो जे २० फुटापर्यंत पैसे मिळतील व ३० फुट रस्ता वापरण्यास मिळेल. आज महानगरपालिकेकडे मोबदल्यासाठी रक्कम नाही. असे प्रस्ताव येतील देण्यासाठी रक्कम नसेल तर प्रस्ताव ठेवून अर्थ नाही. ५०-५० लक्षचे असे प्रस्ताव येतात परंतू वार्डात दोन दोन लक्षची कामे झालेली नाही सहा महिन्याचा कालावधी निघून गेला. मागील वर्षीही कामे झाली नाही.

मा.महापौर : संबंधीत जमीन मालकाने १२७ ची नोटीस दिलेली आहे. दि.१७.११.२००७ पर्यंत निर्णय घेवून कळवायचे आहे. जर निर्णय घेतला नाही तर रस्ता रद्द होईल.

श्री.मनमोनिसिंग ओबेरॉय : खाजगी वाटाघाटीने निर्णय घेण्यात यावा.

श्री.सय्यद खुसरो :यापुर्वी अनेक लोकांनी १२७ च्या नोटीसेस दिलेल्या आहे. त्या संबंधीचे प्रस्ताव आलेले नाही. शहरातील विकास कामासाठी प्रशासनाकडे निधी नाही. या प्रस्तावास रद्द करण्यात यावे. पडेगावचा रस्त्याची गरज आहे का? प्रशासनाने खुलासा करावा.

मा.आयुक्त : शहरासाठी जो डी.पी.प्लॅन तयार केलेले आहे त्यात रस्त्यासाठी जे काही जागा आरक्षीत केलेल्या आहे. त्या दहा वर्षात काही केले नाही तर जमीन मालक १२७ नोटीस देवू शकतात व सहा महिन्यात निर्णय घेतला नाही तर ते आरक्षण रद्द होते. १७ नोव्हेंबर २००७ पर्यंत कार्यवाही केली नाही तर हे आरक्षण रद्दच होईल. या रस्त्याच्या बाजूला जे जमिन मालक असतील पूर्ण रस्त्याची लेन्थ धरून डी.सी.आर प्रमाणे जेवढी जागा सोडावी लागते त्या जागेचे पैसे देत नाहीत. उदा.९ मी. रस्त्याची जागा सोडणारच होते १५ मी पैकी ६ मी. चे पैसे देणार आपण वेळेवर पाठवतो ६५ लक्ष हा अंदाज आहे. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविल्यानंतर विशेष भूसंपादन अधिकारी तपासणी करतील व २/३ रक्कम मागवतील. भूसंपादनाच्या कार्यवाहीस दोन तीन वर्ष लागणार.सर्वसाधारण सभेत निर्णय झाला नाही तर आयुक्तांची वैयक्तिक जबाबदारी आहे, जिल्हाधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठवतील.

मा.महापौर : प्रशासनाने आताच खुलासा केला की डी.पी रस्ता पाहिजे असेल तर यावर निर्णय घ्यावा लागेल. रस्ता करणे गरजेचे आहे की नाही यावर चर्चा करावी.

श्री.सय्यद खुसरो : यापुर्वी ज्यांनी १२७ नोटीसेस दिलेल्या आहे त्या बाबतीत प्रस्ताव का आलेले नाही त्या लोकांना का मोबदला दिला नाही. जो प्रस्ताव सादर केला या जागेचे मालक कोण आहे माझ्या प्रभागातही खरेदी सुचना बजावण्यात आली. त्याचे उत्तर नाही. किराडपुरा भागात १० वर्ष झाले कार्यवाही होत नाही रद्द करावे.

मा.आयुक्त : ज्यांनी १२७ ची नोटीसेस दिलेल्या आहे त्या सर्वाचे प्रकरण सहा महिन्याच्या आत निर्णय झाला नाही तर जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवितो कुणी नोटीस दिली कार्यवाही झाली नाही याची माहिती प्रशासनाकडे दयावी.

श्री.सलीम खान : जागा कुणाची आहे नोटीस कुणी दिली याचा उल्लेख नाही.

श्री.कंवरसिंग बैनाडे : महापालिकेकडे पैसा नाही तुर्त स्थगिती देण्यात यावी.

श्री.अ.रशिद खान : दोन व्यक्ती आहे वाटाघाटीसाठी मा.आयुक्तांनी बोलवावे चर्चा करावी त्यानंतर निर्णय घ्यावा तोपर्यंत प्रस्ताव स्थगित ठेवावा.

श्री.संजय शिरसाट : हा प्रस्ताव स्थगित असतांना सुध्दा या सभागृहासमोर पुन्हा आलेला आहे. या जागेचा मुळ मालक महानगरपालिकेकडे आलेलाच नाही १२७ ची नोटीस दिलेली

आहे परंतु या प्रकरणात दोन वेगवेगळे ७/१२ आहेत. ज्यांनी नोटीस दिली तो मालक राहतो कुठे याची माहिती सुध्दा नगर रचना विभागाने घेतलेली दिसत नाही. कुणी तरी व्यक्तीने अर्ज दिला त्या कागदपत्राच्या आधारे कार्यवाही चालू आहे. जो मुळ मालक आहे त्यांना प्रशासनाने एक नोटीस देवून संबंधीताचे म्हणणे मांडण्याची संधी देवून हा प्रस्ताव यायला पाहिजे होता. १२७ ची नोटीस खरी की खोटी याची शाहनीशा सुध्दा केलेली नाही. यासंबंधी रोष यायला नको खुलासा घ्यावा.

श्री.देसरडा प्रशांत : १२७ ची नोटीस महापालिकेला आलेली असून ती कुणी व किती तारखेला दिलेली आहे. या गट नंबर १११,११४,११७ मध्ये एकुण जमिन किती, किती लेआऊट मंजुर झालेले आहे किंवा २०X३० चे प्लॉट आहे काय याचा खुलासा होणे अपेक्षीत आहे. ज्यांनी नोटीस दिली त्या व्यक्तीच्या संदर्भात मा.न्यायालयात काही वाद चालू आहे काय? दोन ७/१२ आहेत असा उल्लेख आहे या बाबतीत प्रशासनाने काय दखल घेतलेली आहे.

श्री.संजय शिरसाट : जमीन मालकाने १२७ ची नोटीस दिल्यानंतर तो व्यक्ती कुठे राहतो याचा पत्ता महापालिकेकडे नाही. मागील एका प्रकरणात महापालिकेचे अधिकारी यांना मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ७/१२ काढण्याची गरज पडली होती.

मा.महापौर : हा प्रस्ताव एकंदरीत क्लीअर नसल्यामुळे तसेच मालक कोण आहे त्यांचेशी प्रशासनाने चर्चा केलेली नसल्याने परत एकदा स्थगित ठेवून प्रशासनास तशा सूचना देण्यात येत आहे.

श्री.संजय शिरसाट : गुणवाणी प्रकरणासारखी शंका येत आहे. स्थगित न ठेवता शोक्षमोक्ष निर्णय लावण्यात यावा.

मा.आयुक्त : जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणार आहे. भूसंपादनाची पूर्ण प्रोसेस होणार आहे. त्यात नोटीफिकेशन ,सुनावणी दुसऱ्यांदा नोटी फिकेशन सर्व होणार असून जसे गुणवानी प्रकरण झाले तसे होवू नये म्हणून प्रशासनाने खाजगी वाटाघाटी पूर्णपणे बंद केलेल आहे.

श्री.संजय शिरसाट : मा.जिल्हाधिकारी कार्यालयाने सुध्दा चुकीने जमीन भूसंपादीत केली होती हे समोर आलेले आहे. महापालिकेची रक्कम जाणार त्यानंतर चौकशी होत राहणार त्यास वेळ लागेल. त्यासाठी नगररचना विभागाकडून खुलासा घेणे आवश्यक आहे.

श्री.संजय जोशी :यापुर्वी ही जटवाडा भागातील जागेच्या संदर्भात डहाळे नावाच्या व्यक्तीने नोटीस दिलेली होती. नोटीस दिल्यानंतर सेक्रेटरी तसेच मा.आयुक्तांना ॲफिडेटिव्ह केलेले कागदपत्र मुळ मालकाने सादर केले ते सभागृहात सुध्दा दाखवलेले होते त्यावेळी प्रशासनाने दुर्लक्ष केले. डहाळ नोटीस दिली म्हणून मा.जिल्हाधिकारी यांचेकडें प्रकरण पाठविले होते. तसाच प्रकार यात होवू शकतो. संबंधीत मूळ मालकास न बोलविता आलेली नोटीस कशाच्या आधारे मान्य करतो. संबंधीत व्यक्तीला बोलविले होते का त्यांचे कागदपत्र तपासणी केले का, यापुर्वी महापालिकेला एक वेळेस जमिनीच्या प्रकरणात फसवणूक केली होती त्याप्रमाणे होवू नये जी व्यक्ती नोटीस देते त्यांना मा.आयुक्तांनी समक्ष बोलवावे चर्चा करावी. त्यानंतर सभागृहा समोर ठेवावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : असे विविध प्रस्ताव येवून महानगरपालिकेने भूसंपादनासाठी पाच कोटी रू. वाटप केले परंतु सदर जागा अद्याप महापालिकेच्या ताब्यात नाहीत ३२४,३२५ या जागेचे ५६ लक्ष मोबदला तीन वषापुर्वी दिला. हर्सुल येथील एका जागेचा ५७ लक्ष मोबदला दिला परंतु महापालिकेच्या ताब्यात जागा आलेली नाही. तसेच माझ्या वार्डातील सादातनगर भागात चार एकर जागा घेतली ५५ लक्ष दिले अद्याप जागा ताब्यात घेतलेली नाही. श्री.निकम भूसंपादन अधिकारी यांची तक्रार नोंदविण्यात

यावी. दोन वर्षापासून पाठपुरावा करीत आहेत. चेलीपुरा येथील जागे पोटी ५६ लक्ष दिले ताबा का घेतलेला नाही. भूसंपादन अधिकारी पैशाची मागणी करतात मलाही मागविले होते. मी स्वत: त्या अधिकाऱ्या विरूध्द पोलीस आयुक्त विभागीय आयुक्त तसेच, पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्यूरो तसेच शासनाचे पोलीस महासंचालक यांचेकडे तक्रार केलेली आहे.

श्री.संजय जोशी: विरोधी पक्षनेता यांचेकडून एखादा अधिकारी पैशाची मागणी करीत असेल तर कार्यवाही झाली पाहिजे. पैसे कुणी मागणी केले याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :चेलीपुरा येथील गुणवानी यांचे बंधूनी जागा घेतली पैसे दिले ताबा का घेतलेला नाही. महापालिकेचे एक जबाबदार अधिकारी यांनी त्यांना राहू द्यावे म्हणून म्हटले.

श्री.संजय शिरसाट : विरोधी पक्षनेता यांनी जे आरोप केले त्यांची चौकशी झाली पाहिजे. मागील वेळेस सुध्दा पैसे दिल्या नंतर संचिका मिळते असे आरोप केले होते या दोन्ही प्रकरणाची मा.आयुक्तांनी चौकशी करून कार्यवाही करावी. शांततेने पाहावे. सोक्षमोक्ष करावे.

श्री.सय्यद खुसरो : श्री.निकम यांची बदली झालेली आहे. त्यांचेकडे ॲडीशनल चार्ज दिला करोडो रू.ची जागा श्री.निकम त्यांचे अधिकारात घेत आहोत. त्यांचे पदनाम काय आहे. त्याची बदली होवूनही अति.चार्जवर किती दिवस या विभागाचे कामकाज चालणार आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ९ ठिकाणच्या जागा भूसंपादीत करून पाच कोटी रू.वाटप केले. तीन वर्ष झाले अद्याप महानगरपालिकेने जागा ताब्यात घेतलेली नाही याची दखल का घेतली जात नाही.

मा.महापौर : विरोधी पक्ष नेत्यांनी ९ अथॉरिटींना तक्रार केली. यासंदर्भात मा.आयुक्तांनी चौकशी करावी व पुढील सर्वसाधारण सभेत माहिती सादर करावी. महापालिकेने ज्या जागेपोटी ५ कोटी रू. दिले. परंतु जागा ताब्यात घेतली नाही. त्याची यादी सभागृहाला द्यावी व जागा ताब्यात घ्यावी. तसेच जे जे अधिकारी कर्मचारी जबाबदार असतील त्यांचेविरूध्द चौकशी लावून मा.संचालक नगर रचना, मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना माहिती द्यावी फॅक्स करावा.

श्री.सय्यद खुसरो :श्री.निकम यांचेकडे नगररचना विभागाचा अति.चार्ज त्वरीत काढून घेण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा : जी जागा ५५ लक्ष मध्ये घेतली परंतू जागा ताब्यात नाही. ती जागा महानगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर आहे किंवा कसे याची सुध्दा चौकशी करावी.

मा.महापौर : या विषयाच्या अनुषंगाने ज्यांनी नोटीस दिलेली आहे त्यास मा.आयुक्तांनी समक्ष बोलवावे तोच व्यक्ती आहे किंवा काय याची खात्री करून घ्यावी. नगररचना विभागाकडून माहिती घेवून त्यानंतर सविस्तर प्रस्ताव पुढील सर्वसाधारण सभेत प्रशासनाने सादर करावा. दिनांक १७.११.०७ पर्यंत कार्यवाही केली नाही तर ते आरक्षण राहणार नाही.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाच्या अनुषंगाने ज्यांनी नोटीस दिलेली आहे त्यास मा.आयुक्तांनी समक्ष बोलवावे तोच व्यक्ती आहे किंवा काय याची खात्री करून घ्यावी. नगररचना विभागाकडून माहिती घेवून त्यानंतर सविस्तर प्रस्ताव पुढील सर्वसाधारण सभेत प्रशासनाने सादर करावा असे ठरले.

**विषय क्र. ११२६/०२ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या टाऊन हॉलचे नुतनीकरण अंतिम टप्प्यात आहे. टाऊन हॉलचा योग्य रितीने वापर व्हावा या उद्देशाने तसेच शहरातील कलादालनाची उणीव भरुन काढण्याच्या दृष्टीने या इमारतीचा वापर "पालिका कला दालन" म्हणून करण्यात यावा. या कला दालनात विविध कलाकृतीचे उदा.पैठणी, हिमरु,हस्तशिल्प,मुर्तीकाम,लाकडी कोरीव काम,सर्व प्रकारच्या पेंटींग्ज,शिल्प कलाकृती, ज्युट बांबू,कागद,फायबर,प्लॉस्टर ऑफ पॅरीस,प्लास्टीक,कापड,काच पासून तयार करण्यात आलेल्या कलाकृतींचे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात यावे. प्रदर्शनातील कलाकृती विक्रीसाठी देखील उपलब्ध होऊ शकतील. कलाकृतींना संकेतांक क्रमांक व मुल्य नमूद केलेला टॅग लावण्यात येईल. विक्री झालेल्या कलाकृतीसाठी मनपा कर्मचारी संगणकीय पावती देईल विक्री झालेल्या कलाकृतींच्या किमतीच्या १५% रक्कम महानगरपालिकेस प्राप्त होऊ शकेल. चार ते पाच कलावंतांचा एक गट सोडत पध्दतीने निवड करुन या गटास १५ दिवसांसाठी टाऊन हॉल आपल्या कलाकृती प्रदर्शित करण्यासाठी निशुल्क उपलब्ध करुन देण्यात येईल. टाऊन हॉलच्या बाहेरील परिसरात देखील काही तात्पुरते तर काही कायमस्वरुपी कलाकृती प्रदर्शित करता येतील. टाऊन हॉल परिसरात एक आधुनिक व कलात्मक कॅफे टेरिया सुरु करण्यात येईल. एम.टी.डी.सी. व आय.टी.डी.सी. च्या वाहनांनी या दालनास भेट द्यावी. या दृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. बॅडमिंटन हॉलमध्ये एम.टी.डी.सी. साठी एक स्टॉल उपलब्ध करुन देण्यात येईल. पर्यटकांना पिण्यासाठी पाणी तसेच प्रसाधनगृह या परिसरात उपलब्ध असेल. कलाकृतींचा स्टॉक ठेवण्यासाठी टाऊन हॉल शेजारील बॅडमिंटनचा हॉल प्रदर्शन कालावधीत कलावंतांसाठी विनाशुल्क उपलब्ध असेल. टाऊन हॉल मध्ये काचेचे शो-केसेस तसेच रॅक्स प्रदर्शनासाठी आवश्यक स्टॅण्डस, लॅम्प्स उपलब्ध करुन देण्यात येतील. कलाकृती तयार करण्याच्या प्रक्रीयेची सी.डी. टी.व्ही. वर प्रदर्शित करण्यात येईल. या प्रकल्पाचे संचालक म्हणून प्रकल्प संचालक श्री.वि.वा.जावरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना किरकोळ व आकस्मिक खर्चासाठी द.म.रुपये ५,०००/- पर्यंतचे देयके मंजूरीचे अधिकार प्रदान करणे योग्य राहील. दैनंदिन देखभाली साठी रुपये ५,०००/- द.म. मानधनावर एक पुर्ण वेळ काळजीवाहक नियुक्त करण्यात येईल. या परिसरात २४ तास सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यात येईल. टाऊन हॉलसाठी सल्लागार समिती खालील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| मनपा आयुक्त | - | अध्यक्ष |
| इन्टॅकचे प्रतिनिधी | - | सदस्य |
| कला दालनाचे संचालक | - | सदस्य सचिव |
| कला दालनाचे काळजीवाहक | - | सदस्य |
| मनपा आयुक्त यांनी सुचविलेले | - | सदस्य |
| कला आणि हस्तकला क्षेत्रातील | - | |
| पाच तज्ञ व्यक्ती | | |

प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल : श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज वास्तू संग्रहालय तयार केले मी महापौर असतांना कमेटी केली कमेटीत १० बाहेरील सदस्य तसेच अध्यक्ष घेतलेले होते मा.आयुक्तांना सदस्य सचिव केले होते. या क्षेत्राशी जे तज्ञ व्यक्ती असतील त्यांना घ्यावे खासदारांना अध्यक्ष म्हणून घेण्यात यावे सदस्य सचिव मा. आयुक्तांना करावे.

श्री.रविकांत गवळी : टाऊन हॉलची इमारत सुशोभिकरण केली किती खर्च झालेला आहे त्यामागचा उद्देश काय होता.

सौ.लता दलाल : यावर किती खर्च झालेला आहे. जे नुतनीकरण केले, बदल केला तो कोणता उद्देश ठेवून केलेला आहे. कला दालनाची दुकाने थाटण्यासाठी जर उपयोग करणार असेल तर ते योग्य होणार नाही. हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा कारण यास ७० लक्ष खर्च केलेले होते माहिती समोर येईल या संदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा केली होती येथे लाईट ॲण्ड साऊंड जसे लाल किल्ला व इतर ठिकाणी तत्सम प्रकारे दाखवले जाते अशा प्रकारची एक सिस्टीम सुरू करावी. कला प्रदर्शन जे असेल त्याची व्यवस्था वेगळी करावी. लाल किल्ला आहे त्याची व्यवस्था तेथे आहे त्यासाठी तरतुद करावी. सदर शो दाखविण्यासाठी तिकीटाची व्यवस्था करावी. पुन्हा हा प्रस्ताव सभागृहासमोर यावा अशी विनंती आहे.

श्री.अ.रशिद खान :महापालिकेचा खर्च होणार आहे त्यावर कंट्रोल ठेवण्यासाठी मा.आयुक्त अध्यक्ष असणे आवश्यक आहे. लालकिल्ल्या प्रमाणे म्युजिकल लाईट लावण्याची कार्यवाही होत असेल तर शहराचा इतिहास बद्दल माहिती दिल्यास दुरदर्शनवर बघुन बाहेरील शहरातील लोक येतील जो उद्देश आहे तो पूर्ण होवू शकतो शॉपींग मध्ये न ठेवता बाहेर असावीत."मलीक अंबर" यांचे नातेवाईक आजही गरीबीत जीवन जगत असून खेडयामध्ये मातीकाम करीत आहे त्यांचे दोन तीन लोकांना नोकरी दिल्यास योग्य होईल. जो हेतू आहे तो साध्य झाल्या सारखे होईल.

श्री.संजय जोशी : ७० ते ८० लक्ष खर्च केल्यानंतर आता कला दालन असावे असे वाटते परंतू यापूढे जेव्हा वास्तू उभी करणार आहे त्याचा उद्देशच समोर ठेवून करावे. बॅडमिन्टन हॉल झाला तीन वेळा त्याचा उपयोग वेगवेगळया कामासाठी केला गेला.कर्मचाऱ्यांना त्याचा उपयोग व्हावा कालातंराने प्रशासन बदलले त्यानंतर दुसऱ्या कामासाठी उपयोग झाला दोन रस्त्याची कामे कमी करून या वास्तु जतन करणे गरजेचे आहे परंतू आधीच उद्देश समोर ठेवून काम करावयास पाहिजे कला दालन पाहिजे हे वाईट नाही लोक शहरात आल्यानंतर ज्या प्राथमिक सुविधा महापालिकेकडून अपेक्षीत आहे त्या मिळायला पाहिजे.

श्री.काशिनाथ कोकाटे :शहरात ऐतिहासिक दरवाजे आहे टाउन हॉलची इमारत आहे हिचे जतन केले पाहिजे हा दृष्टीकोन समोर ठेवून स्थायी समिती समोर हा विषय आलेला होता.कशासाठी उपयोग होणार आहे त्यावेळी चर्चेला विषय आलेला होता.पर्यटक अजिंठा वेरूळ ऐतिहासिक स्थळ पाहण्यास येतात आल्यानंतर पैठणी शाल असेल हिमरू ची आठवण राहील, येणारे पर्यटक आठ दिवस या शहरातील ऐतिहासिक काही तरी बघण्यास मिळेल कला दालन केले तर ते पर्यटकांना पाहता येईल कलेचा आदल बदल करता येईल वैचारिक बैठक होईल या दृष्टीकोनातून ठराव झालेला होता १९९५ ला हे सभागृह झाल्याच्या नंतर जवळपास दहा वर्ष तेथे जाण्यास योग्य वाटत नव्हते.आज तेथे चांगली वास्तू झालेली आहे.कमी खर्चात ही वास्तू तयार झ ालेली आहे जर कमी खर्चात एखादी वास्तू होत असेल तर सकारात्मक भूमिका घ्यायला पाहिजे. कला दालनाचा वापर जास्तीत जास्त पर्यटकास कसा होईल तेथे लाईट सिस्टीम देण्यात यावी संपूर्ण सुविधा केल्यानंतर या शहराचा काया पालट होईल या शहरात सांस्कृतीक वारसा जोपसण्याच्या दृष्टीकोनातून या कला दालनाचा वापर होईल कलादालन झाले पाहिजे त्याची देखभालदुरूस्ती झाली पाहिजे शासकीय खर्च होत आहे अध्यक्षपदी कोणत्याही आयुक्तांना ठेवले तरी हरकत नसावी.

श्री.देसरडा प्रशांत :या शहरात अनेक ऐतिहासिक वास्तू आहे त्याचेही काम करायचे आहे. ही मराठवाडयाची राजधानी असून या शहरास आगळे वेगळे महत्व आहे. विविध जातीधर्माचे पंथाचे लोक या शहरात राहतात बाहेरील पर्यटक या शहरात जास्तीत

जास्त थांबवून एक पर्यटक स्थळ म्हणून शासनाने तसेच सर्व पदाधिकारी मा आयुक्त यांनी हातभार लावला त्याबध्दल सर्वाचे अभिनंदन करतो महाराष्ट्र पर्यटक विकास मंडळ तसेच महानगरपालिका यांचेत एकमत (सांगड) असावयास पाहिजे ती नाही. कोणत्या काळातील ही वास्तू आहे याचा उल्लेख महाराष्ट्र पर्यटक विकास मंडळाकडे व्हावा तसेच "मलीक अंबर" यांचे वारस मातीकाम करतात म्हणून स सदस्य यांनी आताच उल्लेख केला या शहराच्या विकासाच्या दृष्टीने काही उपयोग करून घेता आला तर त्या संबधीत कार्यवाही करावी आणि यास पर्यटन शहर म्हणून ओळखले पाहिजे सेन्ट्रल गव्हरमेन्टपर्यत याची माहिती पोहचावी या शहरासाठी मदत मिळेल या शहरात जास्तीत जास्त पर्यटक आले पाहिजे या दृष्टीने कार्यवाही करावी.

श्री.रविकांत गवळी : या शहराचा ४०० वर्षापूवीचा इतिहास आहे.याची नोंद महापालिकेकडे आहे आतापर्यत पाच दरवाजे दुरूस्तीचे काम केले टाउन हॉलची चांगली दुरूस्ती होणे अपेक्षीत होते जेंव्हा स्थायी समिती समोर प्रस्ताव आला त्यावेळी मी सदस्य होतो हे करण्या मागे काय उद्देश होता याचा स्पष्ट उल्लेख नव्हता.मोठा खर्च करून व्यवस्थीत वास्तू तेथे झालेली आहे हे सर्व मा आयुक्तांच्या अंडरमध्येच ठेवण्यात यावे आणखी खर्च लागत असेल तर डिजीटल साउंड सर्व्हीस करून डीजीटल लाईट करण्यात यावे कला दालन करायचे की नाही नंतर ठरवावे वास्तूचे जतन झाले पाहिजे याची दखल घ्यावी.

श्री.सय्यद खुसरो : मलीक अंबर याचें वारस सध्या माती काम करीत आहे त्यांना काम देण्यात यावे.

श्री.वसंत नरवडे :वास्तुचे नुतनीकरण करून चांगली वास्तू केली तेथे चांगला उपक्रम राबवावा म्हणून कला दालनाचा आपण विचार केला तो योग्यच आहे परंतू ऐनवेळी सभागृहात त्यावर चर्चा करून निर्णय घेणे कितपत योग्य आहे यापूर्वी ज्या काही स सदस्यांच्या कल्पना असतील त्याचा विचार करावयास पाहिजे होता.ज्या काही सूचना असतील त्या तपासून घेता येतील जे कला दालन पर्यटकाच्या दृष्टीने करण्याचा मार्ग काढावा हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

श्री.प्रशांत देसरडा :बाजूलाच बॅडमिटंन हॉल आहे तो तसाच ठेवावा.

मा.आयुक्त :टाउन हॉलची इमारत जतन करण्याचे काम पाच सहा महिण्यापासून सुरू केलेले आहे महापालिकेचा खर्च तर होतच आहे परंतू मा.खासदार श्री.धूत साहेब यांचेकडून निधीची मागणी केली होती त्यांनी २५ लक्ष दिलेले आहे पूर्वी सर्वसाधारण सभा आयोजित होत असे ती जागा पूर्णपणे मोकळी मिळेल व तेथे काही तरी नवीन करता उपयोग घेता येईल अशी अपेक्षा होती जसजसे काम करत गेलो त्यात नवीन नवीन बाबी पूढे यायला सुरूवात झाली तेथे आठ दरवाजे निघाले ते असतील याची पूर्वी माहितीच नव्हती.तसेच पाण्याचा हौद फौडेशन निघाले जानकाराचे पण या विषयी एकमत होत नाही यात सेन्टर पेस मध्ये एक पाण्याची विहीर निघाली तेथ् अंडरग्राऊंड वाटर सप्लाय पूर्वी फारच चांगले होते परंतू त्याचे नुसते अनूशेष शिल्लक राहिलेले आहे याचे कनेक्शन दिसते आऊटपुट दिसते परंतू पूढे कूठे गेले हे दिसून येत नाही.चार पाच बाबी या नंतर लक्षात आलेल्या आहेत. फॉल सिलींग काढल्यानंतर नवीनच वास्तू बाहेर आलेली आहे व पूढे काय करायला पाहिजे या बध्दल इतिहास तज्ञाची बैठक पण झालेली होती.जेंव्हा हॉल निघाला त्यावेळी मा महापौर उपमहापौर यांचे मत होते की तेथे लाईटन साऊंड शो ओपन करू जे की मी औरंगाबाद बोलतो औरंगाबाद बध्दल इतिहास सांगू शकतो त्याबध्दल प्रशासनाने अधिकारी पाठविले होते ज्यांनी गॉल्हेर दिल्ली येथे काम केलेले आहे माझ्या माहिती प्रमाणे सदर कंपनी ही इंदौरची आहे त्यासाठी १९ ते २० लक्ष खर्च येणार आहे.परंतू

लाईटन साऊंड शो बाहेरच होवू शकते आतमध्ये फक्त एक ते दीड फूटाचा स्टेअरस्केच आहे.त्यातून फीरून लाईट ॲन्ड साउन्ड शो होवू शकत नाही.म्हणून आत काय करायचे हा विचार चालू होता कारण तेथे् मेन्टन्ससचा खर्च तरी निघायला पाहिजे.प्रत्येक वेळी महापालिका खर्च करू शकणार नाही. ही कल्पना केली होती की या शहरात कूठेही कला दालन नाही जे कलाकार असतील त्यांना १५.१५ दिवसासाठी उपलब्ध करून देवू त्यावेळी काही चार्ज करणार नाही परंतु जे काही विक्री होईल त्यांचे १५ टक्के महापालिका घे्ईल जेणे् करून महापालिकेचा झ ाालेला खर्च निघेल.त्याचा विचार करून हा प्रस्ताव ठेवलेला आहे.लाईट ॲन्ड साऊंड शो यासाठी ॲड करू शकतो. करण्यासाठी २० लक्ष खर्च अपेक्षीत असून १० लक्ष तिकीटाच्या माध्यमातून वसूल करू शकतो यास मान्यता दयावी जेणे् करून पर्यटक तेथे येवून काही वस्तू खरेदी करू शकतील.१० ते १२ बजेट लागेल या वर्षी नाही झ ााले तरी पूढील वर्षी त्यांचा विचार करू.

मा.महापौर :या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. टाऊन हॉल हा शहरातील जूना हॉल होता तेथे सर्वसाधारण सभा घेतल्या जात होती. त्या वास्तुचे नुतनीकरण करून चांगले काम केलेले आहे हा ठराव दुरूस्तीसह मंजूर करण्यात येत आहे या शहराच्या इतिहासा बद्दल माहिती देणारा लाईट ॲन्ड साऊंड शो करण्यात यावे जो काही खर्च लागेल त्यास तत्वतः मान्यता देण्यात येत आहे ही वास्तु डायरेक्ट मा.आयुक्तांच्या अंडरमध्ये असावी दुसरे अधिकारी नियुक्त करण्यापेक्षा मा.आयुक्तांचे त्यावर नियंत्रण असावे हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.जी कमेटी केलेली आहेत त्यात या सभागृहातील तीन सदस्य घेण्यात यावे लाईट साऊंड शो करीत असतांना लेजरच्या माध्यमातून आणखी काही मॉडीफिकेशन करता आले तर करावे जे मलीक अंबर यांचे वारसांना काम देण्या संदर्भात सूचना केली त्या विषयी प्रशासनाने सकारात्मक विचार करावा दुरूस्तीसह मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या टाऊन हॉल या इमारतीचा वापर "पालिका कला दालन" म्हणून करण्यास व या कला दालनात विविध कलाकृतीचे उदा.पैठणी, हिमरु,हस्तशिल्प,मुर्तीकाम,लाकडी कोरीव काम,सर्व प्रकारच्या पेंटींग्ज,शिल्प कलाकृती, ज्युट बांबू,कागद,फायबर,प्लॉस्टर ऑफ पॅरीस,प्लास्टीक,कापड, काच पासून तयार करण्यात आलेल्या कलाकृतींचे प्रदर्शनाचे आयोजन करण्यास आणि चार ते पाच कलावंतांचा एक गट सोडत पध्दतीने निवड करुन या गटास १५ दिवसांसाठी टाऊन हॉल आपल्या कलाकृती प्रदर्शित करण्यासाठी निशुल्क उपलब्ध करुन देण्यास,टाऊन हॉलच्या बाहेरील परिसरात देखील काही तात्पुरते तर काही कायमस्वरुपी कलाकृती प्रदर्शित करणे,टाऊन हॉल परिसरात एक आधुनिक व कलात्मक कॅफे टेरिया सुरु करणे,एम.टी.डी.सी. व आय.टी.डी.सी. च्या वाहनांनी या दालनास भेट देणे या दृष्टीने प्रयत्न करणे,बॅडमिंटन हॉलमध्ये एम.टी.डी.सी.साठी एक स्टॉल उपलब्ध करुन देणे,पर्यटकांना पिण्यासाठी पाणी तसेच प्रसाधनगृह या परिसरात उपलब्ध असेल,कलाकृतींचा स्टॉक ठेवण्यासाठी टाऊन हॉल शेजारील बॅडमिंटनचा हॉल प्रदर्शन कालावधीत कलावंतांसाठी विनाशुल्क उपलब्ध असेल. टाऊन हॉल मध्ये काचेचे शो-केसेस तसेच रॅक्स प्रदर्शनासाठी आवश्यक स्टॅण्डस, लॅम्प्स उपलब्ध करुन देणे,कलाकृती तयार करण्याच्या प्रक्रीयेची सी.डी. टी.व्ही. वर प्रदर्शित करणे व या प्रकल्पाचे संचालक म्हणून प्रकल्प संचालक श्री.वि.वा.जावरे यांची करण्यांत आलेल्या नियुक्तीस व त्यांना किरकोळ व आकस्मिक खर्चासाठी द.म.रुपये ५,०००/- पर्यंतचे देयके मंजूरीचे अधिकार प्रदान करणे,दैनंदिन देखभालीसाठी रुपये ५,०००/- द.म. मानधनावर एक पुर्ण वेळ काळजीवाहक नियुक्त करणेस आणि या परिसरात २४ तास सुरक्षा रक्षक नियुक्त करण्यास तसेच टाऊन हॉलसाठी सल्लागार समिती खालील प्रमाणे करण्यास मान्यता देण्यांत येते.

मनपा आयुक्त - अध्यक्ष
इन्टॅकचे प्रतिनिधी - सदस्य
कला दालनाचे संचालक - सदस्य सचिव
कला दालनाचे काळजीवाहक - सदस्य
मनपा आयुक्त यांनी सुचविलेले - सदस्य
कला आणि हस्तकला क्षेत्रातील -
पाच तज्ञ व्यक्ती. तसेच या शहराच्या इतिहासा बद्दल माहिती देणारा लाईट ॲन्ड साऊंड शो करण्यात यावे जो काही खर्च लागेल त्यास तत्वतः मान्यता देण्यात येते. व ही वास्तु डायरेक्ट मा.आयुक्तांच्या अंडरमध्ये असावी दुसरे अधिकारी नियुक्त करण्यापेक्षा मा.आयुक्तांचे त्यावर नियंत्रण असावे,उपरोक्त नियुक्त कमेटीमध्ये सभागृहातील तीन सदस्य घेण्यास,लाईट साऊंड शो करीत असतांना लेजरच्या माध्यमातून आणखी काही मॉडीफिकेशन करता आले तर करावे जे मलीक अंबर यांचे वारसांना काम देण्या संदर्भात सूचना केली त्या विषयी प्रशासनाने सकारात्मक विचार करावा या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय पत्रिका

मा.महापौर : विषय क्र.१ ते ५ मंजूर

**विषय क्र. ११२७/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्रमांक ११ येथील इमारत देखभाल दुरुस्तीसाठी ४.५० लक्ष अ.प. ठेवले होते व त्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ४०३६९९/- झालेली आहे व उर्वरीत रक्कम ४६३०१/- माझ्या वार्डातील विविध कामासाठी खर्च करावे.

सुचक : सौ.लक्ष्मी शंकर आशन्ना		अनुमोदक : श्री.सय्यद खुसरो बु-हानोद्दीन

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्रमांक ११ येथील इमारत देखभाल दुरुस्तीसाठी र.रू.४.५० लक्ष ठेवण्यात आलेले आहे. तथापी सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु.४०३६९९/- झालेले असल्यामूळे, उर्वरीत र.रू.४६३०१/- वार्डातील विविध कामासाठी खर्च करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११२८/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र ३० येथील लेखाशिर्षक बदलण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१. | प्रभाग क्र .३० हर्षनगर अंतर्गत स्लम भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. पृ.क्रडब्ल्यु ६२ अ.क्र ६ तरतूद र.१.५ लक्ष | हर्षनगर स्लम भागात पाणीपुरवठा जलवाहीनी स्थलांतर करणे |
| ०२. | प्रभाग क्र. ३० हर्षनगर विविध ठिकाणी पुर्नडांबरीकरण करणे पृ.क्र .डब्ल्यु ५६ तरतूद रक्कम २ लक्ष | |

सुचक : सौ.शोभा मिटकर		अनुमोदक : श्री.विजय खुडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र ३० करीता अर्थसंकल्पात असलेल्या खालीलप्रमाणे कामांचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | जुने लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१. | प्रभाग क्र.३० हर्षनगर अंतर्गत स्लम भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. पृ.क्रडब्ल्यु ६२ अ.क्र ६ तरतूद र.१.५ लक्ष | हर्षनगर स्लम भागात पाणीपुरवठा जलवाहीनी स्थलांतर करणे. रू.३.५० लक्ष. |
| ०२. | प्रभाग क्र . ३० हर्षनगर विविध ठिकाणी पुर्नडांबरीकरण करणे पृ.क्र .डब्ल्यु ५६ तरतूद रक्कम २ लक्ष | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११२९/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २००७-०८ अर्थसंकल्पात पान क्र.W २३१ व अ.क्र. मध्ये वार्ड क्र.१८ पवननगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे करीता ५ लक्ष रु.ची तरतूद करण्यात आलेली आहे परंतू त्या कामाऐवजी वार्ड क्र.१८ पवननगर येथे विविध ठिकाणी जून्या पाईप लाईन काढून नविन पाईप लाईन टाकण्यासाठी वळती करण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.प्रकाश अत्तरदे                    अनुमोदक : श्री.सीताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-०८ अर्थसंकल्पात पान क्र.w २३१ व अ.क्र. मध्ये वार्ड क्र.१८ पवननगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे करीता असलेली र.रू.५.०० लक्ष तरतूद याऐवजी वार्ड क्र.१८ पवननगर येथे विविध ठिकाणी जून्या पाईप लाईन काढून नविन पाईप लाईन टाकण्यासाठी वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३०/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अर्थसंकल्पातील पान क्र.W-२०९ वरील तरतूदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणे.

०१. दिशानगरी येथे ड्रेनेजची व्यवस्था करणे - ५ लाख

०२. देव इंद्रायणी हौ.सो.,बी. ॲड सी. कॉलनी,मुस्तफाबाद व परिसरात मंजूर रेखाकंनात विविध व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे -५ लाख

०३. रामचंद्रनगर येथे ड्रेनेजची व्यवस्था करणे -५ लाख

ह्या कामांची तरतूदीचे लेखाशिर्ष बदलून त्याऐवजी दूसरे काम टाकणे दिशा नगरीत मोकळया जागेचा विकास करणे, उर्वरीत भागात रस्ते करणे.

सुचक : श्री.संजय जोशी,श्री.भाऊसाहेब ताठे          अनुमोदक : श्री.कैलास गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पातील पान क्र.W-२०९ वरील तरतूदीचे खालीलप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

०१. दिशानगरी येथे ड्रेनेजची व्यवस्था करणे - ५ लाख

०२. देव इंद्रायणी हौ.सो.,बी. ॲड सी. कॉलनी,मुस्तफाबाद व परिसरात मंजूर रेखाकंनात विविध व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे -५ लाख

०३. रामचंद्रनगर येथे ड्रेनेजची व्यवस्था करणे -५ लाख

ह्रया कामांची तरतूदीचे लेखाशिर्ष बदलून त्याऐवजी दिशा नगरीत मोकळया जागेचा विकास करणे, उर्वरीत भागात रस्ते करणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३१/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक २५.०९.२००६ रोजी विषय क्र.४८७ अन्वये शासन मंजुर विकास योजनेप्रमाणे मौजे शहानुरवाडी येथील सर्व्हे नं.८ आणि गारखेडा येथील सर्व्हे नं.६१ ची जागा आरक्षण क्र.२६६/ब उद्यानाकरीता आरक्षित असून सदर आरक्षणाचे आवश्यकता नसल्याने आरक्षणातून वगळण्यास सर्वसाधारण सभेची मान्यता झालेली आहे. सदर प्रस्तावावर दि.२५.०९.२००६ रोजीच्या सर्वसाधारण सभेत चर्चा झालेली नसल्यामूळे तसेच सदर प्रस्तावात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्याचा स्पष्ट उल्लेख नसल्यामूळे प्रशासनास पुढील कार्यवाही करण्यास अडचण निर्माण होत आहे.

करिता सदरील प्रस्ताव पुनःश्च सर्वसाधारण सभेत ठेवण्यात येत असून सर्वे क्र.८ शहानुरवाडी, सर्व्हे क्र.६१ गारखेडा यातील आरक्षण क्र.२६६/ब उद्यानाकरीता आरक्षित असलेली सर्व जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये वगळून निवासी भागात सामील करण्याबाबत व सदर कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार जसे, अधिसूचना काढणे, सूचना व हरकती मागविणे,सुनावणी देणे व प्रस्ताव शासनास सादर करणे इत्यादी सर्व अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणे. करिता फेर प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : ०१. श्री.रविकांत गवळी, ०२.सौ.अंजली कोंडेकर

अनुमोदक : ०१.श्री.वसंत नरवडे पाटील, ०२.श्री.सतिष कटकटे, ०३.श्री.रविंद्र गांगे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वे क्र.८ शहानुरवाडी, सर्व्हे क्र.६१ गारखेडा यातील आरक्षण क्र.२६६/ब उद्यानाकरीता आरक्षित असलेली सर्व जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये आरक्षणातून वगळून निवासी भागात सामील करण्यास व सदर कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार जसे, अधिसूचना काढणे, सूचना व हरकती मागविणे,सुनावणी देणे व प्रस्ताव शासनास सादर करणे इत्यादी सर्व अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३२ :**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरातील नागरीकांच्या व शहरात भेट देणाऱ्या पर्यटकांच्या तसेच विविध व्यवसायातील नागरीकांच्या सुविधेसाठी तसेच दारिद्रय रेषे खालील D.W.C.U.A. (Devlopment of Women & Children in Urban Areas) यांना रोजगार मिळून देण्याच्या उद्देशाने औरंगाबाद महानगरपालिका 'ए.एम.सी. टॅक्सी कॅब' हा उपक्रम राबवु ईच्छित आहे.

महानगरपालिकेच्या प्रकल्प विभागातर्फे D.W.C.U.A. गट तयार असून या प्रकल्पासाठी प्रत्येक गटास कर्ज घेवून एक-एक ए.सी.कार खरेदी करावी लागेल. या कारच्या माध्यमातून 'ए.एम.सी. टॅक्सी कॅब' चा उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्याद्वारे D.W.C.U.A. मधील गटास

प्रत्येकी सरासरी प्रतिमाह रू.१०,०००/- ते रू.१५,०००/- उत्पन्न मिळणार असून, महानगरपालिकेस प्रति टॅक्सी प्रति दिन रू.१००/- रॉयल्टी अपेक्षित आहे.

टॅक्सीचे दर मा.विभागीय आयुक्त तथा आर.टी.ए. औरंगाबाद हयांनी निश्चित केल्याप्रमाणे लागू केले जातील.

सदरील प्रकल्पावर महानगरपालिकेच्या 'प्रकल्प विभागाचे'नियंत्रण राहणार आहे व तांत्रिक बाबींसाठी अतिरीक्त शहर अभियंता यांचे अधिपत्याखालील यांत्रिकी विभागाचे नियंत्रण असणार आहे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

<u>**संवाद :**</u>

मा.महापौर : ऐनवेळचा महिला बचत गट संदर्भात प्रस्ताव आलेला आहे मा.आयुक्त सभागृहाला माहिती देतील.

मा.आयुक्त :अनेक महिला बचत गट तयार झालेले आहे त्या महिला बचत गटांना वेगवेगळे व्यवसाय देण्याच्या प्रयत्न आहे.त्या संबधी प्रस्ताव करून बँकेकडे पाठविले जाते केंद्र शासन त्यांना सबसीडी देते. महापालिकेचे २५ वे रौप्य महोत्सवी वर्ष चालू आहे त्या निमित्ताने या बचत गटाच्या मार्फत या शहरात टॅक्सी सुरू करण्याचा मानस आहे. यात महापालिकेचे काहीही खर्च होणार नाही पहिल्यांदा २५ महिला बचत गट सुरू करू त्यांना टॅक्सीबॅकेमार्फत मिळवून देवून लायसन्स दिले जाईल.त्यास केद्र शासनाची सबसिडी आहे बचत गटाच्या मार्फत सिटी टॅक्सी सुरू करून दिले जाईल. प्रत्येक दिवशी एका टॅक्सीमागे महापालिकेला १००रू रॉयल्टी मिळावे म्हणून प्रपोज करीत आहे. शासन स्तरावर या बाबतीत चर्चा झालेली असून शासन यास अनुकूल आहे ट्रान्सपोर्ट आयुक्त तसेच विभागीय आयुक्त तसेच आरटीओचे चेअरमन यांनी सहमती दाखवलेली आहे २५ महिला बचत गट म्हणजे यात २५० महिला सहभागी होतील पाच लक्ष पर्यत चांगली कार गाडी येते बाकीचे जे रेट आहे हे सर्व शासन डिसाईड करेल यात २५० महिलांना रोजगार मिळेल.

श्री.त्र्यंबक तुपे :यात बीपीएल धारकांना की सर्वसाधारण गटांना प्राधान्य देणार आहोत.

मा.आयुक्त :केद्रं शासनाची सबसिडी साठी जो काही बचत गट पात्र असतील त्यांना सहभागी करावे लागेल.

श्री.त्र्यंबक तुपे :बीपीएलचे गट जास्त येतील सर्वसाधारण जे गट आहे त्यांना या सुविधा मिळणार नाही यात बीपीएल तसेच सर्वसाधारण गटासाठी टक्केवारी ठरवावी त्याप्रमाणे् मान्य करावे

मा.आयुक्त : ज्यांना सबसिडी मिळाली नाही तर याचा उपयोग नाही व्यवसाय चालणार नसेल तर फायदा काय, जेव्हा सबसिडी मिळणार तेंव्हा त्याचा व्यवसाय चालणार आहे पाच लक्षची कार येईल यात १.२५ लक्षची शासनाची सबसिडी आहे उर्वरीत रक्कम हे बँकेमधून मिळणार, बॅकेला जे निकष ठरविलेले आहे केद्र. शासनाने किंवा आरबीआयने त्याप्रमाणे् बसत असेल तर सबसिडी मिळणार आहे.१२ ते १३ रू.प्रति किमीप्रमाणे हे शक्य आहे सबसिडी मिळाली नाही तर १५ ते १६ प्र.कि.मीटर पर्यत कुणी बसणे शक्य नाही.

श्री.संजय जोशी:शासनाचे जी सबसिडी आहे ती बीपीएल गटासाठीच आहेत असे वाटते.

श्री.त्र्यंबक तुपे :जे दारिद्रय रेषेखालील लोक होते त्याची यादी पाठविण्यास उशीर झाला त्या यादीनूसार जे गरीब लोक आहे त्यानूसार ते बीपीएल धारक होणार आहे जेंव्हा यादी येईल बचत गट तयार होतील तेंव्हा ही योजना राबविण्यात यावी.

मा.आयुक्त :बीपीएलची लोकांची यादी सीडी होवून शासनाकडे पाठविलेली आहे शासनाकडून यादी मंजूर होण्यास चार पाच महिण्याचा कालावधी लागेल.त्यानंतर गट तयार

होतील सहा महिने गट चालत नाही व आपसात ते सेव्हींग करीत नाही तोपर्यंत शासनाचे सबसिडीसाठी ते पात्र होत नाही. कमीत कमी एक वर्ष लागेल २५ टॅक्सीचे टारगेट आपण ठेवलेले आहे ट्रान्सपोर्ट कमीशनरचे म्हणण् असे होते की कमीत कमी ५० टॅक्सी या शहरात चालवू शकतात.यानंतर आणखी बीपीएल ग्रूप आला तर त्यांना ही देवू शकतो.

श्री.त्र्यबंक तुपे :यास आमचा विरोध नाही बीपीएल कार्ड धारक नसतील त्यांनाही प्राधान्य दयायला पाहिजे.

मा.आयुक्त :सबसिडी न मिळता परवडणार असेल तर हरकत नाही.

सौ.लता दलाल :बीपीएल मध्ये जे असतील त्याचेसाठी ५० टक्के ५० टक्के बचत गटासाठी ठेवण्यात यावे.अशी दुरूस्ती करण्यात यावी.

श्री.प्रशांत देसरडा :ही स्कीम कशासाठी आहे हा ठराव घेणे आवश्यक आहे अनेक सदस्यांना हा ठराव समजलेला नाही.

श्री.त्र्यबंक तुपे :पूढील बैठकीत सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

मा.आयुक्त :या शहरात केंद्र शासनाची सुवर्ण् जयंती रोजगार योजनेची स्कीम चालू आहे.त्या स्कीमच्या अंतर्गत जे काही बचत गट निर्मित झालेले आहे व कमीत कमी सहा महिण्यापासून ते आपसांत बचत करीत आहे तसेच त्यांचे ऑडीट अे प्लस मध्ये येत आहे त्या बचत गटाचा आपण बिजनेस प्रपोजल करतो सर्वसाधारण सभेकडे येत नाही. स्कीम आहे त्यांना १.२५ लक्ष पर्यंतची सबसिडी देतो.प्रत्येक वर्षी काही तरी व्यवसाय देतो जसे पिठाची गिरणी त्यात त्यांना काय फायदा होता एका गटात कमीत कमी १० ते ११ महिला असतात.हा विचार केला होता की एक गटाच्या मार्फत एक सिटी टॅक्सी घेतली तर प्रत्येक गटाला कमीत कमी १० ते १२ हजार रू. महिण्याला मिळू शकतात.जर त्यांना सबसिडी मिळाली तर हे शक्य आहे.आज २५ टॅक्सी दिल्या भविष्यात नवीन गट येऊन मागणी करू शकतो जे कुणी लोक असतील त्यांचे नाव एपीएल यादीमध्ये जे ही लोक असतील परंतू त्यांचे नाव जाहीर झालेले नाही त्यांना सबसिडी न मिळता परवडणार असेल तर घेवू शकतात.चांगला प्रतिसाद मिळाला तर आणखी पाच दहा टॅक्सी वाढवू शकतो.रॉयल्टी जी घ्यायची आहे त्यासाठी सभगृहासमोर आलेले आहे टॅक्सी चालवितांना थोडी सेप्टी दयायची आहे कारण तीनही शिप्ट मध्ये टॅक्सी चालणार आहे.जर कुणी पॅसेंजर टॅक्सी करीत असेल तर जीपीआरच्या सिस्टमनूसार टॅक्सी ट्रॅप पण करायची आहे.म्हणून रॉयल्टी १००रू. प्रत्येक टॅक्सीमागे म्हटलेले आहे.जर एक टॅक्सी १५० कि.मी. दिवसाला रनींग करीत असेल तर एका बचत गटाला किमान १० ते १५ हजार रू प्रत्येक महिण्याला मिळू शकतात.तेवढे उत्पन्न महानगरपालिकेला नाही आणि तो उददेशही महापालिकेचा नाही परंतू २५० महिलांना त्यांचे प्रत्येक महिलेला १०००रू किमान मिळतील.त्या त्या गटातून वाहन चालकास रक्कम देतील.एपीएलच्या लोकांना स्पेशल काही सवलत देवू शकणार नाही.सबसिडी न मिळता त्यांना परवडत असेल तर प्रशसनाची काही हरकत नाही.यादी आल्यानंतर गट तयार करावे लागते सहा महिने आपसांत सेव्हींग करावे लागते.सेव्हींगचे २० ते २५ हजार असतील तर बँक त्यांना कर्ज वगैरे देवू शकेल.टॅक्सी पाच लक्ष पर्यतंची असणार आहे १२ ते १३ रू. किमी प्रमाणे एसी टॅक्सी चालवू शकते नॉन एसी करणार नाही.

श्री.संजय जोशी :बँक गॅरन्टी कोण घेणार आहे महापालिका बँकेकडे रिकमन्ड म्हणून काय करणार आहे त्यावेळी १ ऑफ द एक पार्ट म्हणून रहावे बँक मागणी करेल.

मा.आयुक्त :महापालिका गॅरन्टी देणार नाही आतापर्यत कोण्तत्याही प्रपोजसाठी देत नाही.पाच लक्षची कार असेल तर १.२५ लक्ष सबसिडी असेल उर्वरीत रक्कमेसाठी गाडी बँकेकडे तारण राहिल.

श्री संजय जोशी :जगातील कोणतीही बँक नुसती गाडी तारण ठेवून कर्ज देत नाही.त्यासाठी दोन गॅरेटर लागतात त्यांचे पेमेन्ट त्या पर्यत पोहचते.

मा.आयुक्त :त्यांना आरबीआयचे डायरेक्शन असतात तितकी प्रायेव्हीटी लेंडींग यास्कीमसाठी करावी लागते.पिठाची गिरणी देतांना किराणा दुकान देतांना महापालिका हमी देत नाही.

श्री.संजय जोशी :गॅरन्टी महापालिकेने घेवू नये.

मा.महापौर :गॅरंन्टी महापालिका घेणार नाही.

श्री.संजय सिरसाट :या महिलाचा विकास झाला पाहिजे त्यांना रोटी रोजी मिळाली पाहिजे १००रू काही फरक पडत नाही असे आयुक्तांनी आताच म्हटले आहे या महिलांना त्यांचे पायावर उभे राहू दयावे ३०००रू. महिण्याला घ्यायचे ठरले तर ३६ हजार रू. महिला कमवू लागलो.त्या महिलासाठी महापालिकेचे सहकार्यच असावे. कमविण्याचा विचार करू नये.३६ हजार आपण घेणार आहोत वाहन चालक यांनी ४ हजार घेणार उर्वरीत पाच ते सहा हजार बँकेचा त्यांनी हप्ता भरणार यात त्या महिला गटांना अगोदर पैसे टाकावे लागणार असून त्यानंतर त्यांना नफा मिळणार आहे.गाडीचे वर्षभर मेन्टनन्स खर्च बघीतला तर त्या महिला गटांना काही दिवसानंतर बंद होण्याची वेळ येईल.उलट त्यांचेवरच कार्यवाही होईल.त्यासाठी एक वर्षभर कोणतीही रॉयल्टी घेवू नये. त्यांना त्यांचे पायावर उभे राहू दयावे. याचे आउटपूट बाहेर येवू दयावे नंतर रॉयल्टी घ्यावी.

मा.आयुक्त :उत्पन्न मिळवायचे म्हणून रॉयल्टी घ्यायची हे कारण नाही.कॉल सेन्टर ट्रॅक करावे लागेल त्यामध्ये सात ते आठ लोक राहतील.त्यांचे एकूण पगार ४५ ते ५० हजार पर्यत येईल.

श्री.संजय शिरसाट : या शहराची लोकसंख्या १२ लक्ष असून टुरीस्ट टॅक्सचा व्यवसाय होत नाही तीन शिप्ट मध्ये गाडी चालविण्याचा विचार करतो मूंबई सारख्या शहरात तीन शिप्ट मध्ये गाडया चालणे शक्य होत नाही. हा विचार बाजूला ठेवून महिला बचत गटांना टॅक्सी दयावी ते मेन्टनन्स करतील त्याचां ट्रॅक काय असेल ते जर महापालिकेला गरज पडली तर त्यांना फोनवर बोलवू शकतो.ज्या २५ महिला असणार आहे त्यांनी त्याचे एक कार्यालय उघडावे एका गटाकडून ३ हजार म्हणजे ७५ हजार रू घेत आहेत. कशासाठी घ्यायचे, हे बरोबर नसून अगोदर त्यांना त्याचे पायावर उभे राहू द्यावे.

मा.आयुक्त :कॉल सेन्टर करावे लागतील. कमीत कमी ५० हजार महिण्याला खर्च लागेल. महापालिका स्वतः हा खर्च करू शकत नाही.पहिल्या वर्षी कमीत कमी ५० हजार रू. मिळावयास पाहिजे. पूढील वर्षी पून्हा निणर्य घेवू शकतो. प्रोजेक्ट रिपोर्ट मध्ये लिहून दयावे लागेल कारण सर्व खर्चाचा हिशोब घेणार आहे.

श्री.संजय सिरसाट : कॉल सेन्टर का करीत आहोत बचत गटाना त्यांचे अधिकार वापरू दयावे.एएमटी बसेससाठी असेच केले.

मा.आयुक्त : कॉल सेन्टरमध्ये कन्ट्रोल लागेल. आपले नसले तरी त्यांचे लागेल.कॉल सेन्टरमध्ये पॅसंजर कसे जाणार

मा.महापौर :महापालिका प्रयत्न करीत आहे सक्सेस झाले तर ठिक आहे नसता बचतगट करतील जसे महापालिकेने एएमटी बसेस सुरू केली त्याप्रमाणे करू नागरीकासाठी सुविधा आहे.

श्री.संजय सिरसाट :रिक्षा,हातगाडी,टॅक्सी सर्वच सेवा दयावेत आपण जो निणर्य घेत आहेत ते चूकीचे आहे. सर्वच जबाबदारी मनपाने घेणे योग्य वाटत नाही.

मा.महापौर :नागरीकांसाठी सुविधा आहे आपला विरोध नोंदवून घेतलेला आहे.

श्री.संजय सिरसाट :एकटयाचा विरोध न नोंदता पक्षातील संपूर्ण सदस्यांचाच विरोध नोंदवावा. कॉल सेन्टर करणे ही महापालिकेची जबाबदारी नसून महाराष्ट्रामध्ये कूठेही कॉल सेंन्टर नाही. मुंबईत ६ लाख गाडया चालतात कुठेही कॉल सेंटर नाही. टॅक्सी चालविणे, हा महापालिकेचा व्यवसाय होऊ शकत नाही.

मा.महापौर :महापालिकेचा धंदा नाही परंतू परवानगी दिली जाते.

श्री.संजय सिरसाट :तीन शिप्ट मध्ये गाडया चालणार त्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेणे योग्य नाही.

मा.आयुक्त :कॉल सेन्टर यासाठी करणार आहोत की एक पर्टीकुलर नंबर असावयास पाहिजे तेथे सिटीजन फोन करू शकतील की टॅक्सी पाठवावी कॉल सेन्टर केले नाही तर कन्ट्रोल कसे करणार आहे.

श्री.संजय सिरसाट :रजिस्टर युनियनला बॅसस्टॅण्ड सारख्या ठिकाणी जागा दिलेली आहे भविष्यात रिक्षासाठी कॉलसेन्टर सुरू करावे लागतील महानगरपालिकेने ५० रू.घ्यावे. ना नफा ना तोटा तत्वावर असावे.

मा.महापौर :खाजगी टॅक्सी सेन्टर आहे त्याप्रमाणे चालवायचे का?यावर कूणाचे कंन्ट्रोल राहणार आहे

मा.आयुक्त :कॉल सेन्टर महापालिका करीत नाही फक्त आऊट सोर्स करणार आहे ते सुध्दा एखादया बचतगटला आऊट सोर्स करू शकतो.

श्री.संजय सिरसाट :भविष्यात यांचा सुध्दा ठेका दिला जाईल.

श्री.काशिनाथ कोकाटे :यात पूष्कळ तृटया दिसून येत आहे. कोणत्या बीपीएल गटाचे किंवा खुल्या गटाचे बसतात या सर्व बाबीचा खूलासा होणे अपेक्षीत आहे. सर्वांना याची प्रत वितरीत करावी. प्रस्ताव चांगला आहे.महिला बचत गट सक्षम स्वावलंबी झाल्या पाहिजे सभागृहाचे ही मत आहे. शासन किती अनुदान देणार याचीही माहिती प्रस्तावाद्वारे देण्यात यावी. अभ्यास करून सुधारीत प्रस्ताव पुन्हा यावा.

श्री.कचरू मोरे :प्रशासनाने ज्याकाही योजना राबविण्याचे ठरविले आहे याचा विचार करता हा प्रस्ताव मंजूर करणे गरजेचे आहे.केरळ मध्ये महिला बचत गटाच्या वतीने बसेस चालतात २५ टॅक्सी देतो वाईट काम नाही.महापालिकेचे नाव होईल व सिटी टॅक्सीचे संरक्षण ही होईल.हा प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

श्री.अ.रशीद खान : कॉल सेन्टर कूठे करीत आहेत.जागा किती देणार आहे यापूर्वी झुनका भाकर केद्रांसाठी जागा दिली त्या ठिकाणी दुसरेच व्यवसाय सुरू झालेले आहे.प्रशासनाचे धोरण चांगले आहे परंतू तेथे पून्हा झुनका भाकर केंद्र होणार नाही याची दखल घ्यावी.

मा.आयुक्त : ही शसनाची रेग्यूलर स्किम आहे जनरली किराणा स्टोअर किंवा इतर काही व्यवसाय चालावे म्हणून देत होतो.आता विभागून हे काम दिले तर या महिलाचा व्यवसाय चालवू शकतो कॉल सेन्टर करणे आवश्यक आहे महापालिकेचे कर्मचारी तेथे असणार नाही बचत गटाचे एक सेन्टर असावयास पाहिजे ते सूध्दा बचत गटास चालवण्यासाठी देवू शकतो.एएमटीच्या बाजूला जागा देण्याचा प्रयत्न करू.

मा.महापौर : यात ५ पदाधिकारी,मा.आयुक्त बसून नियम ठरवतील. हा प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील नागरीकांच्या व शहरात भेट देणाऱ्या पर्यटकांच्या तसेच विविध व्यवसायातील नागरीकांच्या सुविधेसाठी तसेच दारिद्रय रेषे खालील D.W.C.U.A. (Devlopment of Women & Children in Urban Areas) यांना रोजगार मिळून देण्याच्या उद्देशाने औरंगाबाद महानगरपालिका 'ए.एम.सी. टॅक्सी कॅब' हा उपक्रम राबविणेस तसेच यासंदर्भात ५ पदाधिकारी,मा.आयुक्त यांनी बसून नियम ठरविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ११३३ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, स्व.विजयेंद्र काबरा यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळ, हैद्राबाद मुक्ती संग्राम तसेच मराठवाडा विकास व औरंगाबाद शहरातील शैक्षणिक, सामाजिक कार्यालयातील योगदान पाहता खडकेश्वर येथील त्यांचे रहाते घर मिल कॉर्नर ते औरंगपुरा या रस्त्यावर स्थित आहे. तरी त्यांच्या या महद् कार्याची दखल घेवून महानगरपालिकेतर्फे मिल कॉर्नर ते औरंगपुरा या रस्त्यास स्व.विजयेंद्र काबरा मार्ग असे नाव देण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.लता दलाल, श्री.राजु वैद्य, श्री.संतोष जेजुरकर

अनुमोदक : श्री.वसंत नरवडे पाटील,श्री.सय्यद खुसरो,श्री.सिताराम सुरे,श्री.नारायण कुचे, श्री.सलीम खान यासीन खान

**<u>संवाद :</u>**

सौ.लता दलाल :माझ्या प्रभागात स्वातंत्र सैनिक स्व. विजेंद्र काबरा राहत होते. त्यांचा उद्या स्मृती दिन आहे. प्रस्ताव मंजुर करावा.

मा.महापौर : मान्यता देण्यात येते. तसेच लेखा शिर्षक बदलण्याचे जेही ऐनवेळचे ठराव असतील त्यास मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मिलकॉर्नर ते औरंगपुरा या रस्त्यास स्व.विजयेंद्र काबरा मार्ग असे नाव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ११३४ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६७ मधील खालील विविध विकास कामे वार्ड क्र.७३ मध्ये करण्यात यावीत. करीता खालील प्रमाणे अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक बदलुन विकास कामे करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | शिवशंकर कॉलनी ते तारामती मंगल कार्यालया पर्यंत नाला संरक्षण भिंत बांधणे. पृ.क्र.डब्ल्यु २१२ अ.क्र.३२ तरतुद रक्कम ८ लक्ष | प्रभाग क्र.७३ एस.टी. कॉलनी प्रबोधनकार ठाकरे नगर येथील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेसाठी रू.५ लक्ष वळती करणे. |
| ०२ | उत्तमनगर ते बालाजीनगर पर्यंत नाल्यातील मेन सिल्वर लाईन बदलणे पृ.क्र.डब्ल्यु २१३ अ.क्र. ७ तरतुद र.८ लक्ष | |
| ०३ | बालाजीनगर मधील विहीरीवर फिल्टरसह पाण्याची टाकी बसविणे.पृ.क्र.डब्ल्यु २१४ अ.क्र.९ तरतुद रक्कम ५ लक्ष. | |
| | बालाजीनगर येथील विहीरी मधील गाळ काढणे. पृ.क्र.डब्ल्यु २१४ | प्रभाग क्र ७३ प्रबोधनकार |

| | | |
|---|---|---|
| ०४ | अ.क्र.८ तरतुद र.२ लक्ष | ठाकरेनगर बी.एम.२ मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे. साठी २५ लक्ष वळती करणे. |
| ०५ | उत्तमनगर,नाथनगर येथे हापसे बसविणे पृ.क्र.डब्ल्यु २१५ अ.क्र.३४ तरतुद र.२ लक्ष | |
| ०६ | उत्तमनगर बौध्दनगर अंतर्गत विविध विकासाची कामे करणे. पृ.क्र.डब्ल्यु २२७ अ.क्र.२२ तरतुद र.५ लक्ष | |

सुचक : श्री.रविंद्र लक्ष्मणराव गांगे अनुमोदक : श्री.दामोधर माधवराव शिंदे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६७ मधील खालील विविध विकास कामे वार्ड क्र.७३ मध्ये करण्यास खालील प्रमाणे अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१ | शिवशंकर कॉलनी ते तारामती मंगल कार्यालया पर्यंत नाला संरक्षण भिंत बांधणे. पृ.क्र.डब्ल्यु २१२ अ.क्र.३२ तरतुद रक्कम ८ लक्ष | प्रभाग क्र.७३ एस.टी. कॉलनी प्रबोधनकार ठाकरे नगर येथील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणेसाठी रू.५ लक्ष वळती करणे. |
| ०२ | उत्तमनगर ते बालाजीनगर पर्यंत नाल्यातील मेन सिल्वर लाईन बदलणे पृ.क्र.डब्ल्यु २१३ अ.क्र. ७ तरतुद र.८ लक्ष | |
| ०३ | बालाजीनगर मधील विहीरीवर फिल्टरसह पाण्याची टाकी बसविणे.पृ.क्र.डब्ल्यु २१४ अ.क्र.९ तरतुद रक्कम ५ लक्ष. | |
| ०४ | बालाजीनगर येथील विहीरी मधील गाळ काढणे. पृ.क्र.डब्ल्यु २१४ अ.क्र.८ तरतुद र.२ लक्ष | |
| ०५ | उत्तमनगर,नाथनगर येथे हापसे बसविणे पृ.क्र.डब्ल्यु २१५ अ.क्र.३४ तरतुद र.२ लक्ष | प्रभाग क्र ७३ प्रबोधनकार ठाकरेनगर बी.एम.२ मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे. साठी २५ लक्ष वळती करणे. |
| ०६ | उत्तमनगर बौध्दनगर अंतर्गत विविध विकासाची कामे करणे. पृ.क्र.डब्ल्यु २२७ अ.क्र.२२ तरतुद र.५ लक्ष | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ११३५ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६ बेगमपुरा मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W २१४ | निपट निरंजन येथे पाण्याची टाकी बांधणे -२.०० लक्ष | प्रभाग क्र.६ बेगमपुरा मध्ये विविध ठिकाणी हापसे बसविणे -२.०० लक्ष |

सुचक : श्री.विनायक प्रभाकर पांडे अनुमोदक : श्री.रविकांत गवळी

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६ बेगमपुरा मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W २१४ | निपट निरंजन येथे पाण्याची टाकी बांधणे -२.०० लक्ष | प्रभाग क्र.६ बेगमपुरा मध्ये विविध ठिकाणी हापसे बसविणे -२.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९८ नक्षत्रवाडी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खाली दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्पपानन | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W २२२/६० | पैठणरोड ते महानुभव आश्रम समोरील रस्त्यावर पेव्हिंगब्लॉक बसविणे.-८.०० लक्ष | १.महानुभवआश्रम चौकात हायमस्ट बसविणे बाबत.५लक्ष५० हजार<br>२. प्रभाग क्र.९८, अंतर्गत विविध भागात विद्युत पोलसह विद्युत पथदिवे लावणे.-२ लक्ष ५० हजार |

सुचक : सौ.अनिता नंदकुमार घोडेले अनुमोदक : श्री.गजानन बारवाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९८ नक्षत्रवाडी मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खाली दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्पपानन | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W २२२/६० | पैठणरोड ते महानुभव आश्रम समोरील रस्त्यावर पेव्हिंगब्लॉक बसविणे.-८.०० लक्ष | १. महानुभव आश्रम चौकात हायमस्ट बसविणे बाबत.-५ लक्ष ५० हजार<br>२. प्रभाग क्र.९८, अंतर्गत विविध भागात विद्युत पोलसह विद्युत पथदिवे लावणे.-२ लक्ष ५० हजार |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३७ :**

औरंगाबाद महानगरपालिकेकडून शासन पुरस्कृत एकात्मीक गृहनिर्माण योजना (HSDP) राबविली जात आहे. सदर योजनेतुन महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आंबेडकरनगर, ब्रिजवाडी आणि राहुलनगर या घोषीत स्लम वसाहतीमध्ये लाभधारकांसाठी सदर योजना राबविली जात आहे. सदर योजनेतुन शासनाकडून मिळणारा निधी प्रत्येक घरकुलासाठी रूपये ८०,०००/- एवढाच मर्यादित राहणार आहे. सदर घरकुल योजनेतील मर्यादित निधी व घरकुल बांधणी कामाचे अंदाजपत्रकाचे दर हे दोन वर्ष पुर्वीच्या म्हणजे २००५-२००६ या वर्षीच्या दरसूची दराआधारीत आहेत. सदर योजनेतुन वरील तिन वसाहतीच्या प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी यापुर्वीच दिलेली आहे. सदर घरकुल योजनेच्या निविदा दोन वेळेस मागविल्या नंतरही सदर निविदेस मिळणारा प्रतिसाद अत्यल्प आढळत आहे. सदर योजना कामाचे निविदा दर दोन वर्षे जुने असल्याने सदर प्रकल्प निविदेस अत्यल्प प्रतिसाद मिळत आहे.

शासन पुरस्कृत घरकुल योजना प्राथमिकदृष्टया राबविणे अत्यंत फलदाई व गरजेचे राहणार आहे. तथापी योजना खर्चास दोन वर्षापुर्वीच्या दरानुसार व रूपये ८०,०००/- प्रति घरकुल या मर्यादेत राहून निधि उपलब्ध होणार असल्याने घरकुल योजनेतील व्यवहार्य अडचणींवर मात करण्यासाठी ठोस धोरण निर्णय राबविणे आवश्यकता दिसुन येते. वर प्रस्तावित निधीच्या मर्यादा लक्षात घेता व प्रती घरकुल आवश्यक असणारा चालू दरसूची आधारीत वाढीव खर्च अदमासे २५% म्हणजेच प्रती घरकुल २०,०००/- एवढा वाढीव भार प्रत्येक घरकुलासाठी महानगरपालिका संस्थेच्या माध्यमातुन उचलनेचे निकड आढळते. सदर योजनाचे माध्यमातून समाजाचे तळागळातील घटकासाठी घरकुल बांधणीचे प्राथमिक गरजेचे साधन उपलब्ध होणार असल्याने आणि सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेकडून वर प्रस्तावित प्रमाणे प्रत्येक घरकुलास जवळपास २५% इतका वाढीव भार महानगरपालिके कडून उचलणे आवश्यक राहील. सदर वाढीव खर्चातुन घरकुलाचे दर्शनी प्रवेशद्वार अधिक मजबूत बांधणीचे आणि आरसीसी सज्या इत्यादी वाढीव आवश्यक बाबी समाविष्ट करणे शक्य राहील. तरी वर प्रस्तावितनुसार (HSDP) योजना कामातील प्रत्येक घरकुल बांधणीसाठीचे वाढीव खर्च २५% वाढीस व वाढीव खर्च महानगरपालिकेचे स्लम विभागाचे निधीतुन भागविणेस मान्यतेस्तव प्रस्ताव सादर आहे.

सुचक : श्री.कचरू सोनवणे अनुमोदक : श्री.मिलींद दाभाडे, श्री.सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेकडून शासन पुरस्कृत एकात्मीक गृहनिर्माण योजना (HSDP) राबविली जात असल्यामूळे,सदर योजनेतुन महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आंबेडकरनगर, ब्रिजवाडी आणि राहुलनगर या घोषीत स्लम वसाहतीमध्ये लाभधारकांसाठी सदर योजना राबविली जात असून,सदर योजनेतुन शासनाकडून मिळणारा निधी प्रत्येक घरकुलासाठी रूपये ८०,०००/- एवढाच मर्यादित राहणार असून, सदर योजना कामाचे निविदा दर दोन वर्षे जुने असल्याने सदर प्रकल्प निविदेस अत्यल्प प्रतिसाद मिळत आहे. प्रस्तावित निधीच्या मर्यादा लक्षात घेता व प्रती घरकुल आवश्यक असणारा चालू दरसूची आधारीत वाढीव खर्च अदमासे २५% म्हणजेच प्रती घरकुल २०,०००/- एवढा वाढीव भार प्रत्येक घरकुलासाठी महानगरपालिका संस्थेच्या माध्यमातुन उचलनेस व वाढीव खर्च महानगरपालिकेचे स्लम विभागाचे निधीतुन भागविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,औरंगाबाद महानगरपालिका व गाथा बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मागील वर्षापासून "महापौर चषक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे" आयोजन करण्यात येत आहे.

गतवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा औरंगाबाद महानगरपालिका व गाथा बहुउद्देशिय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने "महापौर चषक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे" आयोजन करण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर

अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे, श्री.वसंत नरवडे पाटील, श्री.नारायण कुचे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद महानगरपालिका व गाथा बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गतवर्षाप्रमाणे, महापौर चषक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत खेळाडूंच्या कलागुणाला वाव मिळावा यासाठी राज्यस्तरावर फास्ट सायकलींग स्पर्धा "राज्यस्तरीय महापौर चषक फास्ट सायकलींग स्पर्धा"चे आयोजन करण्यात यावे. सदरील स्पर्धा औरंगाबाद जिल्हा सायकलींग असोसिएशन, औरंगाबाद (Aurangabad District Cycling Associtation, Aurangabad) याच्यामार्फत घेण्यात याव्यात.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.सलीम खान यासीन खान

अनुमोदक : श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन, श्री.विजय खुडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत राज्यस्तरीय महापौर चषक फास्ट सायकलींग स्पर्धाचे आयोजन करण्यास व सदरील स्पर्धा औरंगाबाद जिल्हा सायकलींग असोसिएशन, औरंगाबाद (Aurangabad District Cycling Associtation, Aurangabad) याच्यामार्फत घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६७ मधील खालील विविध विकास कामे वार्ड क्र.१९ मध्ये करण्यात यावीत. करीता खालील प्रमाणे अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक बदलून विकास कामे करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१. | प्र.क्र.६७ उत्तमनगर नाथनगर शिवशंकर कॉ.येथे हापसे बसविणे. डब्ल्यु २१५ अ.क्र.३४ तरतूद र.रू.२ लक्ष | प्र.क्र.१९शिवनेरी कॉ.म्हाडा कॉ. फुटपाथ व अंतर्गत रोडवर पेव्हींग ब्लॉक बसविणे व नविन कॉंक्रीट रोड तयार करणे. |
| ०२. | प्र.क्र.६७ बालाजीनगर मधील विहीरीतील गाळ काढणे. डब्ल्यु २१४ अ.क्र.८ तरतूद र.रू.२ लक्ष | |
| ०३. | प्र.क्र.६७ बालाजीनगर मधील विहीरीवर फिल्टर सहीत पाण्याची टाकी बसविणे. डब्ल्यु २१४ अ.क्र.९ तरतूद रक्कम ५ लक्ष | |
| ०४. | प्र.क्र.६७ उत्तमनगर ते बालाजीनगर पर्यंत नाल्यातील मेन सिल्वर लाईन बदलणे. डब्ल्यु ११३ अ.क्र.७ तरतूद रक्कम ८ लक्ष. | |
| ०५. | प्र.क्र.६७ शिवशंकर कॉलनी ते तारामती मंगल कार्यालय नाला संरक्षण भिंत बांधणे. डब्ल्यु ११२ अ.क्र.३२ तरतूद रक्कम ८ लक्ष | |
| ०६. | प्र.क्र.६७ सायली होटल ते नाथनगर पर्यंत उर्जा बचत दिवे लावणे. डब्ल्यु १९६ अ.क्र.४८ तरतूद रक्कम ३ लक्ष. | |
| ०७. | प्र.क्र.६७ उत्तमनगर बौध्दनगर अंतर्गत विविध विकासाची कामे करणे. डब्ल्यु २२७ अ.क्र.२२ तरतूद रक्कम ५ लक्ष. | |
| ०८. | प्र.क्र.६७ शरद प्रोव्हीजन्स ते शिवशंकर कॉलनी नाला मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. डब्ल्यु १६६ अ.क्र.२१ तरतूद रक्कम ५ लक्ष. | |

सुचक : श्री.रविंद्र गांगे अनुमोदक : श्री.अनिल जुगललाल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६७ मधील खालील विविध विकास कामे वार्ड क्र.१९ मध्ये करण्याकरीता खालीलप्रमाणे अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१. | प्र.क्र.६७ उत्तमनगर नाथनगर शिवशंकर कॉ.येथे हापसे बसविणे. डब्ल्यु २१५ अ.क्र.३४ तरतूद र.रू.२ लक्ष | प्र.क्र.१९शिवनेरी कॉ.म्हाडा कॉ. फुटपाथ व अंतर्गत रोडवर पेव्हींग ब्लॉक बसविणे व नविन कॉंक्रीट रोड तयार करणे. |
| ०२. | प्र.क्र.६७ बालाजीनगर मधील विहीरीतील गाळ काढणे. डब्ल्यु २१४ अ.क्र.८ तरतूद र.रू.२ लक्ष | |
| ०३. | प्र.क्र.६७ बालाजीनगर मधील विहीरीवर फिल्टर सहीत पाण्याची टाकी बसविणे. डब्ल्यु २१४ अ.क्र.९ तरतूद रक्कम ५ लक्ष | |
| ०४. | प्र.क्र.६७ उत्तमनगर ते बालाजीनगर पर्यंत नाल्यातील मेन सिल्वर लाईन बदलणे. डब्ल्यु ११३ अ.क्र.७ तरतूद रक्कम ८ लक्ष. | |
| ०५. | प्र.क्र.६७ शिवशंकर कॉलनी ते तारामती मंगल कार्यालय नाला संरक्षण भिंत बांधणे. डब्ल्यु ११२ अ.क्र.३२ तरतूद रक्कम ८ लक्ष | |
| ०६. | प्र.क्र.६७ सायली होटल ते नाथनगर पर्यंत उर्जा बचत दिवे लावणे. डब्ल्यु १९६ अ.क्र.४८ तरतूद रक्कम ३ लक्ष. | |

| | | |
|---|---|---|
| ०७. | प्र.क्र.६७ उत्तमनगर बौध्दनगर अंतर्गत विविध विकासाची कामे करणे. डब्ल्यु २२७ अ.क्र.२२ तरतूद रक्कम ५ लक्ष. | |
| ०८. | प्र.क्र.६७ शरद प्रोव्हीजन्स ते शिवशंकर कॉलनी नाला मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. डब्ल्यु १६६ अ.क्र.२१ तरतूद रक्कम ५ लक्ष. | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७१ मधील खालील विविध विकास कामे वार्ड क्र.१९ मध्ये करण्यांत यावीत. करीता खालीलप्रमाणे अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक बदलून विकास कामे करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१. | प्र.क्र.७१ विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु १८८ अ.क्र.६९ तरतूद रक्कम ५ लक्ष. | प्र.क्र.१९शिवनेरी कॉ.,म्हाडा कॉ.फुटपाथ व अंतर्गत रोडवर पेव्हींग ब्लॉक बसविणे व कॉंक्रीट रोड तयार करणे. |
| ०२. | वार्ड क्र.७१ चौंडेश्वरी सो.येथे कमान बांधणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.२३२ वर तरतूद रक्कम ३ लक्ष. | |

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील                    अनुमोदक : श्री.अनिल जुगललाल जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७१ मधील खालील विविध विकास कामे वार्ड क्र.१९ मध्ये करण्यांकरीता खालीलप्रमाणे अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक | नविन लेखाशिर्षक |
|---|---|---|
| ०१. | प्र.क्र.७१ विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.डब्ल्यु १८८ अ.क्र.६९ तरतूद रक्कम ५ लक्ष. | प्र.क्र.१९शिवनेरी कॉ.,म्हाडा कॉ.फुटपाथ व अंतर्गत रोडवर पेव्हींग ब्लॉक बसविणे व कॉंक्रीट रोड तयार करणे. |
| ०२. | वार्ड क्र.७१ चौंडेश्वरी सो.येथे कमान बांधणे. अर्थसंकल्पातील पृ.क्र.२३२ वर तरतूद रक्कम ३ लक्ष. | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९४ बन्सीलालनगर मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W १९७ | वार्ड क्र.९४ शाहूनगर येथील उद्यानात हायमास्ट लावणे बाबत-३.३० लक्ष | १.वार्ड क्र.९४ राजनगर उद्यानात हायमास्ट लावणे बाबत-२.२० लक्ष (या कामाकरीता वळती करणे.)<br>२. वार्ड क्र.९४ बन्सीलालनगर मध्ये विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत -१.१० लक्ष. |

सुचक : सौ.अल्पा विकास जैन                    अनुमोदक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९४ बन्सीलालनगर मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|

| पान नं. | | |
|---|---|---|
| W १९७ | वार्ड क्र.९४ शाहूनगर येथील उद्यानात हायमास्ट लावणे बाबत-३.३० लक्ष | १.वार्ड क्र.९४ राजनगर उद्यानात हायमास्ट लावणे बाबत-२.२० लक्ष (या कामाकरीता वळती करणे.)<br>२. वार्ड क्र.९४ बन्सीलालनगर मध्ये विविध ठिकाणी पेव्हर ब्लॉक बसविणे बाबत -१.१० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ११४३ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या प्रभागातील पाण्याच्या जुन्या जलवाहिन्या काढुन नविन डि.आय.के च्या लाईन टाकणे अत्यंत आवश्यक आहेत. सदरील कामासाठी २००७-०८ च्या अर्थसंकल्पामध्ये पान नं. डब्ल्यु २१४ वर अनु क्र.१० प्रमाणे पाणीपुरवठा देखभाल दुरूस्ती या लेखा शिर्षका अंतर्गत १०.०० लाखांची तरतुद करण्यात आली आहे. सदरील तरतुद भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखा शिर्षका अंतर्गत असणाऱ्या पान नं.२१६ अनु.क्र.३५ या कामासाठी वळवण्यात यावी जेणे करून दोनही कामे एकत्रितरित्या करणे सोयीचे होईल. करीता आजच्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : डॉ.आशा बिनवडे अनुमोदक : श्री.त्र्यंबक तुपे

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभागातील पाण्याच्या जुन्या जलवाहिन्या काढुन नविन डि.आय.के च्या लाईन टाकणे करीता सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पामध्ये पान नं. डब्ल्यु २१४ वर अनु क्र.१० प्रमाणे पाणीपुरवठा देखभाल दुरूस्ती या लेखा शिर्षका अंतर्गत असलेली र.रू.१०.०० लाखांची तरतुद भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखा शिर्षका अंतर्गत असणाऱ्या पान नं.२१६ अनु.क्र.३५ या कामासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ११४४ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९३ वेदांतनगर मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| डब्ल्यु १५३ | वार्ड क्र.९३ विविध ठिकाणी बागा देखभाल दुरूस्ती करणे-१.०० लक्ष | १. वार्ड क्र.९३ कोकणवाडी चौक सौंदर्यीकरण करणे-३.५० लक्ष<br>२. वार्ड क्र.९३ कोकणवाडी चौकातील अहिल्याबाई होळकर यांचा जुना पुतळा बदलून त्या ठिकाणी अहिल्याबाई होळकर यांचा मोठया उंचीचा नवीन पुतळा बसविणे- १२.५० लक्ष. |
| डब्ल्यु १५५ | १. वार्ड क्र.९३ अंतर्गत सार्वजनिक मुतारी दुरूस्त करणे-२.५० लक्ष<br>२. वेदांतनगर शौचालयाची दुरूस्ती करणे-१.०० लक्ष | |
| डब्ल्यु १९३ | वार्ड क्र.९३ बॅडमींटन हॉलच्या समोरील कंपौड वॉलची उंची वाढविणे व किरकोळ कामे करणे-३.०० लक्ष | |
| डब्ल्यु १९७ | वार्ड क्र.९३ वेदांतनगर चौकात हायमास्ट लावणे-३.०० लक्ष | |
| डब्ल्यु १९९ | १. वार्ड क्र.९३ रचनाकार कॉलनी येथील उद्यान विकसीत करणे-३.०० लक्ष<br>२. वार्ड क्र.९३ विविध ठिकाणी खेळणी बसविणे -२.५० लक्ष | |

सुचक : श्री.संजय शिरसाट अनुमोदक : श्री.राजेश व्यास

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वार्ड क्र.९३ वेदांतनगर मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

<table>
<tr><td>अर्थसंकल्प पान नं.</td><td>कामाचे नांव</td><td>सुधारीत कामाचे नांव</td></tr>
<tr><td>डब्ल्यु १५३</td><td>वार्ड क्र.९३ विविध ठिकाणी बागा देखभाल दुरूस्ती करणे-१.०० लक्ष</td><td rowspan="5">१. वार्ड क्र.९३ कोकणवाडी चौक सौंदर्यीकरण करणे-३.५० लक्ष<br>२. वार्ड क्र.९३ कोकणवाडी चौकातील अहिल्याबाई होळकर यांचा जुना पुतळा बदलून त्या ठिकाणी अहिल्याबाई होळकर यांचा मोठया उंचीचा नवीन पुतळा बसविणे- १२.५० लक्ष.</td></tr>
<tr><td>डब्ल्यु १५५</td><td>१. वार्ड क्र.९३ अंतर्गत सार्वजनिक मुतारी दुरूस्त करणे-२.५० लक्ष<br>२. वेदांतनगर शौचालयाची दुरूस्ती करणे-१.०० लक्ष</td></tr>
<tr><td>डब्ल्यु १९३</td><td>वार्ड क्र.९३ बॅडमींटन हॉलच्या समोरील कंपौड वॉलची उंची वाढविणे व किरकोळ कामे करणे-३.०० लक्ष</td></tr>
<tr><td>डब्ल्यु १९७</td><td>वार्ड क्र.९३ वेदांतनगर चौकात हायमास्ट लावणे-३.०० लक्ष</td></tr>
<tr><td>डब्ल्यु १९९</td><td>१. वार्ड क्र.९३ रचनाकार कॉलनी येथील उद्यान विकसीत करणे-३.०० लक्ष<br>२. वार्ड क्र.९३ विविध ठिकाणी खेळणी बसविणे -२.५० लक्ष</td></tr>
</table>

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.३५ येथील मनपा अर्थसंकल्प २००७-०८ मधील खालील कामाचे हेडचेंज करण्यांत यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | पान क्र. | जुना लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १३ | ५९ | गरमपाणी वार्ड क्र.३५ अंतर्गत रस्ते पुर्नडांबरीकरण करणे रक्कम रूपये ०२ लक्ष | सिध्दार्थ गार्डन येथे विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता सदर रक्कम वळती करणे. |

सुचक : श्री.अब्दुल रशिद खान (मामु)

अनुमोदक : श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार, श्रीमती खान मेहरून्नीसा बेगम

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३५ येथील मनपा अर्थसंकल्प २००७-०८ मधील खालील कामाचे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | पान क्र. | जुना लेखाशिर्ष | नविन लेखाशिर्ष |
|---|---|---|---|
| १३ | ५९ | गरमपाणी वार्ड क्र.३५ अंतर्गत रस्ते पुर्नडांबरीकरण करणे रक्कम रूपये ०२ लक्ष | सिध्दार्थ गार्डन येथे विविध ठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे या कामाकरीता सदर रक्कम वळती करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील पेज क्र.डब्ल्यु ११० अ.क्र.१२,प्रभाग क्र.५१ मध्ये विविध ठिकाणी गटार दुरूस्त करणे रक्कम रू. २.५० लक्ष ऐवजी वळती करून इंदिरानगर (दक्षिण) बायजीपुरा प्रभाग क्र.५१ येथे फुटकळ व इमारत दुरूस्ती करणे करीता मंजूरी देण्यांत यावी.

सुचक : श्री.कैलास गायकवाड    अनुमोदक : श्री.अनिल जैस्वाल,श्री.अ.रशिद खान (मामु)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील पान क्र.डब्ल्यु ११० अ.क्र.१२, प्रभाग क्र.५१ मध्ये विविध ठिकाणी गटार दुरूस्त करणे रक्कम रू. २.५० लक्ष याऐवजी

इंदिरानगर (दक्षिण) बायजीपुरा प्रभाग क्र.५१ येथे फुटकळ व इमारत दुरूस्ती करणे करीता वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३४ खडकेश्वर येथील खालील कामांचे लेखा शिर्षक बदलण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखा शिर्षक | नविन लेखा शिर्षक |
|---|---|---|
| १ | अर्थसंकल्प २००७-२००८ पृष्ठ क्र.डब्ल्यु २३४ वरील अ.क्र.१२ वर प्रभाग क्र.३४, खडकेश्वर अंतर्गत वार्डात जलवाहिनी टाकणे (५.०० लाख) तरतुद आहे. | प्रभाग क्र.३४ खडकेश्वर विविध ठिकाणी फुटकळ कामे करणे बाबत (५.०० लाख रूपये वळती करणे.) |

सुचक : श्री.सय्यद खुसरो सय्यद बुऱ्हानोद्दीन    अनुमोदक : श्रीमती खान मेहरून्नीसा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.३४ खडकेश्वर येथील खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | अर्थसंकल्पातील लेखा शिर्षक | नविन लेखा शिर्षक |
|---|---|---|
| १ | अर्थसंकल्प २००७-२००८ पृष्ठ क्र.डब्ल्यु २३४ वरील अ.क्र.१२ वर प्रभाग क्र.३४, खडकेश्वर अंतर्गत वार्डात जलवाहिनी टाकणे (५.०० लाख) तरतुद आहे. | प्रभाग क्र.३४ खडकेश्वर विविध ठिकाणी फुटकळ कामे करणे बाबत (५.०० लाख रूपये वळती करणे.) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९४ बन्सीलालनगर मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतूदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| अर्थसंकल्प पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W-१९७ अ.क्र.६९ | वार्ड क्र.९४ डेक्कन फ्लोअर मील ते उड्डाण पुल शेजारील रस्त्यावर पथदिवे व्यवस्था करणे-३.०० लक्ष मधून रू.०.५० लक्ष वळती करणे. | वार्ड क्र.९४ राहुलनगर येथे विद्यापीठ गेट प्रतिकृती तयार करणे -०.५० लक्ष (या कामाकरीता वळती करणे) |

सुचक : सौ.अल्पा विकास जैन    अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९४ बन्सीलालनगर मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतूदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अर्थसंकल्प पान क्र. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| W-१९७ अ.क्र.६९ | वार्ड क्र.९४ डेक्कन फ्लोअर मील ते उड्डाण पुल शेजारील रस्त्यावर पथदिवे व्यवस्था करणे-३.०० लक्ष मधून रू.०.५० लक्ष वळती करणे. | वार्ड क्र.९४ राहुलनगर येथे विद्यापीठ गेट प्रतिकृती तयार करणे -०.५० लक्ष (या कामाकरीता वळती करणे) |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नंदनवन कॉलनी येथे बॅडमिंटन हॉल बांधणेसाठी रक्कम स्पिल रक्कम रू.१३ लक्षचे अंदाजपत्रक मंजूर आहे. परंतु त्या भागातील नागरीकांचा फक्त बॅडमिंटन हॉल बांधण्यास विरोध असून त्या ठिकाणी भव्य सभागृह बांधून देण्यांत यावे अशी मागणी आहे.

त्याकरीता उपरोक्त १३ लक्षची तरतूद कमी पडणार असल्यामूळे, मा.सर्वसाधारण सभा दि.१८.०७.२००७ विषय क्र.९०६/३ नुसार प्रभाग क्र.९ येथे जिम्नॅशिअम हॉल बांधणे या कामासाठी उपलब्ध असलेली रक्कम रू.८ लक्ष वळती करण्यांत यावे व एकूण २१ लक्ष चे अंदाजपत्रक तयार करून भव्य सांस्कृतीक सभागृह व जिम्नॅशियम हॉल बांधण्यात यावे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.पुरूषोत्तम रघुविरसिंह ठाकुर,श्री.संजय शिरसाट
अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर, श्री.मोहन मेघावाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नंदनवन कॉलनी येथे बॅडमिंटन हॉल बांधणेसाठी स्पिल रक्कम रू.१३ लक्षचे अंदाजपत्रक मंजूर असल्यामूळे, व सदर ठिकाणी भव्य सभागृह बांधावयाचे असल्यामूळे, मा.सर्वसाधारण सभा दि.१८.०७.२००७ विषय क्र.९०६/३ नुसार प्रभाग क्र.९ येथे जिम्नॅशिअम हॉल बांधणे या कामासाठी उपलब्ध असलेली रक्कम रू.८ लक्ष तरतूद वळती करण्यांस व एकूण २१ लक्ष चे अंदाजपत्रक तयार करून भव्य सांस्कृतीक सभागृह व जिम्नॅशियम हॉल बांधणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११५० :**

प्रभाग क्रमांक -६२ समतानगर येथील प्रभागातील कामाचे लेखाशिर्षात खालीलप्रमाणे बदल करण्यांत यावा.

| मुळ लेखाशिर्ष | | बदल करण्यात आलेले लेखाशिर्ष | |
|---|---|---|---|
| ०१. W-१५ अ.क्र.३७ पुष्पनगरी ते म्हाडा कॉलनी ह्युम पाईप कल्वर्ट बांधणे | ०५ लाख | याऐवजी वॉर्ड क्र.६२, कोटला कॉलनीमध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे | १५ लाख |
| ०२. W-१८७ अ.क्र.-५५ वॉर्ड क्र.६२ मधील विवेकानंद कॉलेज चौक ते सतीष पेट्रोलपंप रोड साईडला पेव्हर ब्लॉक बसविणे | ०५ लाख | | |
| ०३. W-१८७ अ.क्र.-५८ प्रभाग क्र.-६२ समतानगर मधील विविध ठिकाणी गल्ल्यामध्ये कॉक्रीटींग करणे. | ०५ लाख | | |

सुचक : श्री.भगवान घडमोडे अनुमोदक : श्री.सीताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक -६२ समतानगर करीता अर्थसंकल्पात असलेल्या कामाचे खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| मुळ लेखाशिर्ष | | बदल करण्यात आलेले लेखाशिर्ष | |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. W-१५ अ.क्र.३७ पुष्पनगरी ते म्हाडा कॉलनी ह्युम पाईप कल्वर्ट बांधणे | ०५ लाख | याऐवजी<br>वॉर्ड क्र.६२, कोटला कॉलनीमध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे | १५ लाख |
| ०२. W-१८७ अ.क्र.-५५ वॉर्ड क्र.६२ मधील विवेकानंद कॉलेज चौक ते सतीष पेट्रोलपंप रोड साईडला पेव्हर ब्लॉक बसविणे | ०५ लाख | | |
| ०३. W-१८७ अ.क्र.-५८ प्रभाग क्र.-६२ समतानगर मधील विविध ठिकाणी गल्ल्यामध्ये कॉक्रीटींग करणे. | ०५ लाख | | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११५१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिका चौक सुशोभिकरण करणे अंतर्गत शिवाजी महाराज चौक,शाहु महाराज चौक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, अण्णाभाऊ साठे चौक या चौकात विद्युत नारळाची झाडे लावण्यात यावेत. या करिता लागणारा खर्च महापौर विशेष निधी या लेखाशिर्षातून करण्यात यावा. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती मिराताई रामराव शिंदे अनुमोदक : श्री.संजु रिडलॉन,श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका चौक सुशोभिकरण करणे अंतर्गत शिवाजी महाराज चौक,शाहु महाराज चौक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, अण्णाभाऊ साठे चौक या चौकात विद्युत नारळाची झाडे लावण्यास व या करिता लागणारा खर्च महापौर विशेष निधी या लेखाशिर्षातून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११५२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२२७ वर अनुक्रमांक ९ अन्वये प्रभाग क्र.२६ अंतर्गत विविध विकासाची कामे करणे या लेखाशिर्षा अंतर्गत १५.०० लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याऐवजी सदरील तरतूद प्रभाग क्रमांक २६ येथे पाणी पुरवठा करणे या लेखाशिर्षा अंतर्गत वळती करण्यात यावी.

करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.काशिनाथ कोकाटे अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक डब्ल्यु-२२७ वर अनुक्रमांक ९ अन्वये प्रभाग क्र.२६ अंतर्गत विविध विकासाची कामे करणे या लेखाशिर्षा अंतर्गत र.रू.१५.०० लक्षची करण्यात आलेली तरतूद याऐवजी सदरील तरतूद प्रभाग क्रमांक २६ येथे पाणी पुरवठा करणे या लेखाशिर्षा अंतर्गत वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११५३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मनपा स्विमिंगपूल कडे जाणारा रस्ता वर एका बाजूस बसस्टँड/क्वॉर्टरची भिंत दूसऱ्याकडे औरंगाबाद टेक्सटाईलची भिंत व रशिद मामू कॉलनी रोड तेथून स्विमिंगपुलकडे जाणारा मार्ग आहे लोकांना माहितीसाठी रस्त्यावर एक कमान बांधण्यासाठी मनपा

अर्थसंकल्पात तरतूद करून कमान बांधण्यात यावे व नावाचे बोर्ड लावणे. सदर काम सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात २.५० ते ३.०० लाखाची तरतूद करून सदर कामाबाबतचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयासाठी म्हणून मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती खान मेहेरून्नीसा बेगम अनुमोदक : श्री.स.खुसरो,श्री.संजय जगताप

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपा स्विमिंगपूल कडे जाणारा रशिद मामू कॉलनी रोडवर कमान बांधण्यासाठी मनपा अर्थसंकल्पात तरतूद करणेस व नावाचे बोर्ड लावणेस तसेच सदर कामाकरीता सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात र.रू. २.५० ते ३.०० लाखाची तरतूद करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.११५४ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने, औरंगाबाद जिल्हा व शहर तालीम संघ व महानगरपालिका औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने ५१ वे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे प्रौढगट कुस्ती अधिवेशन व राज्य अजिंक्यपद महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा-२००७ औरंगाबाद येथील मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर दिनांक ११ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित केलेल्या आहेत. या स्पर्धेचे भव्य प्रमाणात आयोजन करण्यात येणार असुन त्यासाठी राज्यभरातून स्पर्धक भाग घेणार आहेत. स्पर्धेचे स्वरूप पाहता मोठया प्रमाणात खर्च लागणार असल्याने स्पर्धेकरीता महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत मिळण्याची विनंती औरंगाबाद जिल्हा व शहर तालीम संघ यांच्या वतीने महानगरपालिकेच्या सर्व स.पदाधिकाऱ्यांकडे करण्यात आलेली आहे. अशा प्रकारची स्पर्धा आपल्या शहरात प्रथमच आयोजित करण्यात येत आहे. करीता कुस्तीगीर अधिवेशन व या स्पर्धेसाठी महानगरपालिकेच्या वतीने रू.२५.०० लक्ष (अक्षरी पंचवीस लाख रूपये) आर्थिक मदत देण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : सौ.लता दलाल, श्री.त्र्यंबक तुपे, श्री.संतोष जेजुरकर,
श्री.प्रशांत देसरडा, श्री.बाबासाहेब डांगे, श्री.विनायकराव पांडे

अनुमोदक : श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.अ.रशीद खान (मामू) श्री.संजय जोशी,
श्री.वसंत नरवडे पाटील, श्री.भगवान घडमोडे, श्री.किशोर तुलसीबागवाले

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने, औरंगाबाद जिल्हा व शहर तालीम संघ व महानगरपालिका औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने ५१ वे महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे प्रौढगट कुस्ती अधिवेशन व राज्य अजिंक्यपद महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा-२००७ औरंगाबाद येथील मराठवाडा सांस्कृतिक मंडळाच्या मैदानावर दिनांक ११ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित केलेल्या असल्यामूळे, या स्पर्धेसाठी महानगरपालिकेच्या वतीने रू.२५.०० लक्ष (अक्षरी पंचवीस लाख रूपये) आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.११५५ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२६ गणेशनगर या प्रभागातील नाला ट्रेनिंगचे काम करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी आर्थिक तरतुद उपलब्ध करणे आवश्यक असून महानगरपालिकेस १२ व्या वित्त आयोगाकडून जे अनुदान प्राप्त झालेले आहे त्या अनुदानातील रक्कम रू.२५.०० लक्ष वार्ड क्र.२६ मधील नाला ट्रेनिंगच्या कामाकरीता वळती करण्यात यावेत.

करीता १२ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त अनुदानातून वार्ड क्र.२६ मधील नाला ट्रेनिंगचे कामासाठी रक्कम रू.२५.०० लक्ष (अक्षरी रूपये पंचवीस लाख) वळती करण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.काशिनाथ कोकाटे, श्री.भाऊसाहेब ताठे
अनुमोदक : श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२६ गणेशनगर या प्रभागातील नाला ट्रेनिंगचे काम करणे करीता महानगरपालिकेस १२ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त अनुदानातून र.रू.२५.०० लक्ष वार्ड क्र.२६ मधील नाला ट्रेनिंगच्या कामाकरीता वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.११५६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला त्यांचे ड्रम प्रकल्प (Drum Project) शहराच्या भविष्यातील विजेची निकड व वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी शहराच्या निरनिराळया भागात एकूण ३३/११ केव्हीचे ११ उपकेंद्र उभारण्यासाठी कायमस्वरूपी जमीन लागणार आहे. यापूर्वी त्यांना समाधान कॉलनी येथील जागा उपलब्ध करून देण्याबाबत दि.१८.०७.०७ रोजी सर्वसाधारण सभेने ठराव क्र.९२६ अन्वये मान्यता दिलेली असून आता सदर कंपनीस मुजीब कॉलनी (कटकटगेट येथील) सर्वे नं.५४ नाला व मुख्य डीपी रोड लगत व १६७९.२० चौरस मीटर आणि सिटी सर्वे क्र.१५३१५ च्या बाजूस नाल्याच्या मागील बाजूस ११५० चौ.मी.अशी एकूण २८२९.२० चौ.मी.हे ३३/११ केव्ही उपकेंद्र रोषणगेट/कटकटगेट येथे उभारणीसाठी आवश्यक असल्याने सदर जमीन शासन मान्य बाजारमुल्य दरानुसार (शिघ्र सिध्द गणक दर)/शासकीय नियमानुसार कायमस्वरूपी देणे बाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने विनंती केलेली आहे. सदर जमीन विद्युत वितरण कंपनीस देण्यासाठी व जमीन वापरात आवश्यक ते फेरबदल करून विद्युत वितरण कंपनीचे ड्रम प्रोजेक्टसाठी वापरण्याकरीता आवश्यकता भासल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करून व सदर कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्त महानगरपालिका यांना प्रदान करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीला त्यांचे ड्रम प्रकल्प (Drum Project) शहराच्या भविष्यातील विजेची निकड व वितरण व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी शहराच्या निरनिराळया भागात एकूण ३३/११ केव्हीचे ११ उपकेंद्र उभारण्यासाठी सदर कंपनीस मुजीब कॉलनी (कटकटगेट येथील) सर्वे नं.५४ नाला व मुख्य डीपी रोड लगत व १६७९.२० चौरस मीटर आणि सिटी सर्वे क्र.१५३१५ च्या बाजूस नाल्याच्या मागील बाजूस ११५० चौ.मी.अशी एकूण २८२९.२० चौ.मी. जमीन शासन मान्य बाजारमुल्य दरानुसार (शिघ्र सिध्द गणक दर)/शासकीय नियमानुसार कायमस्वरूपी देणेस मान्यता देण्यांत येते. तसेच सदर जमीन विद्युत वितरण कंपनीस देण्यासाठी व जमीन वापरात आवश्यक ते फेरबदल करून विद्युत वितरण कंपनीचे ड्रम प्रोजेक्टसाठी वापरण्याकरीता आवश्यकता भासल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करून व सदर कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्त महानगरपालिका यांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.प्रल्हाद निमगावंकर :महिला बालकल्याण समितीच्या बजेटमधून एपीएल, बीपीएल धारकांना सायकल वाटप करणार असून माझ्या वार्डात एकही बीपीएल धारक नाही तर एपीएल धारक असतील त्यांना देण्यात यावे.

सौ.लता दलाल : यात वयाची अट आहे बीपीएल एपीएल कूणी असेल तर सायकल देता येते.

मा.महापौर : एक वार्डात तीन सायकल देण्याचे ठरलेले आहे या प्रमाणे कार्यवाही करावी.

श्री.प्रल्हाद निमंगावकर : दि.१८.७.२००७ च्या बैठकीत मी मुद्दा मांडला होता की माझ्या वार्डात पाण्याच्या टाकीजवळ खुली जागा आहे त्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे ते काढून तेथे् संरक्षीत भिंत बांधण्यात यावी.त्या जागेवर मोठे अतिक्रमण झालेले आहे. तसेच गारखेडा वार्डात मेहरनगर मोठी वसाहत असून तेथे महानगरपालिकेची खुली जागा आहे एक व्यक्ती ती जागा माझी आहे असा दावा करतो. या बाबतीत कोर्ट मॅटर चालू आहे संरक्षित भिंत बांधलेली होती आज तेथे अतिक्रमण झालेले आहे.त्यावर चर्चा विधी सल्लागार यांचेकडून खूलासा घेण्यात यावा.

मा.महापौर :विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

विधी सल्लागार :मेहरनगर येथील जागेच्या संदर्भात मा. न्यायालयाने आदेशीत केले की सदर खुली जागा ही आरक्षीत आहे परंतू त्याबद्दलचे मालकी हक्काचे कागत्रपत्र मनपाकडे नाही त्यामूळे महापालिकेकडे कागदपत्र असतील तर मालकी हक्क खलच्या न्यायालयात सिध्द करावे.

श्री.प्रल्हाद निमंगावकर :ऑलरेडी महापालिकेने तेथे संरक्षित भिंत बांधलेली आहे.

श्री.संजय सिरसाट :सदर जागेचे महापालिकेकडे मालकी हक्काबाबत कागदपत्र नसतांना संरक्षित भिंत नियमानूसार बांधलेली होती का याचा सुध्दा खुलासा होणे अपेक्षीत आहे.कशी बांधली होती.

मा.महापौर :मालकी हक्क नसतांना महापालिकेने संरक्षित साठी का खर्च केलेला आहे.

विधी सल्लागार :अगोदर संरक्षित भिंत बांधली होती म्हणूनच महापालिकेविरूध्द कोर्टात प्रकरण दाखल केलेली आहे.

मा.आयुक्त :खालच्या कोर्ट मध्ये सिध्द करावे लागणार आहे की आपली मालकी आहे १५ दिवसात जुने सर्व कागदपत्र काढून सिव्हील कोर्ट मध्ये दाखल करून मालकी सिध्द करण्याचा प्रयत्न करू.

श्री.प्रशांत देसरडा : संबधीत जागेच्या संदर्भात कोर्ट प्रकरण चालू आहे. स. सदस्य प्रत्येक मिटींगमध्ये माहिती विचारतात जो व्यक्ती न्यायालयात जातो हे अगोदरच माहित असते तरी सुध्दा कागदपत्र न्यायालयात सादर केले जात नाही.

मा.आयुक्त :मा.उच्च न्यायालयाने असे म्हटले की, तेथे महापालिकेचे आरक्षण आहे परंतू मालकी सिध्द होत नाही त्यामूळे अगोदर मालकी सिध्द करावी त्यानंतर संरक्षित भिंत बांधावी.

श्री.संजय सिरसाट :संरक्षित भिंत होवून जवळपास १२ वर्ष झालेले आहे.

श्री.देसरडा प्रशांत :जेंव्हा न्यायालयात हेरींग चालते त्यावेळी महापालिकेचे वकील हजर नसतात अशी माहिती आहे.

श्री.प्रल्हाद निमंगावकर : स्थायी समिती मध्ये नेहमी या बाबत चर्चा केली सभापतीनी आदेश दिले. काहीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही.

श्री.भगवान घडमोडे : संरक्षित भिंत होवून १२ वर्षे झाले तेंव्हा पासून आजपर्यत मालकी हक्क प्रशासनाने सिध्द केलेला नाही. ही दुर्दैवाची बाब आहे. ज्यांनी या बाबतीत हलगर्जीपणा केला त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

श्री.देसरडा प्रशांत :जे कूणी अधिकारी दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी.

सौ.कला बोरामणीकर :अशाच प्रकारची जागा समर्थनगर भागात आहे त्याही जागेवर अतिक्रमण झ ाालेले आहे. अनेक वेळा कळविले कार्यवाही होत नाही.

श्री.प्रल्हाद निमंगावकर :लक्ष्मीनगर भागात महापालिकेच्या पाण्याच्या टाकीजवळ खूली जागा आहे तेथे अनधिकृत झोपडपटटया झालेल्या आहेत. प्रत्येक वेळी सदस्यांनीच प्रशासनाच्या

निदर्शनास आणून दयायचे का सभागृहातही मुद्या मांडला होता आपण आदेशीत केले आपल्या आदेशाचे पालन होत नसेल तर योग्य नाही.आजही त्या जागेवर अनधिकृत झोपडया आहेत.

श्री.भगवान घडमोडे : जेंव्हा स.सदस्य मुद्या मांडणार आहे तेंव्हाच प्रशासन कार्यवाही करणार आहे का? नगरसेवकांना अधिका-यांच्या मागे फिरावे लागते कोणेत्याही कामाचे अंदाजपत्रक तयार नाहीत अशी परीस्थिती आहे.

श्री.अ.रशिद खान : आताच म्हटले कागदपत्र मिळत नाही तो भाग वेगळा परंतू सर्वे नं.५१,५२,५३,५४ ही जागा असून आरपी नाथ यांची होती महापालिकेने भुसंपादीत केली होती चौकशी करावी. रेकॉर्डला आहे.

मा.महापौर :विधी सल्लागार यांनी याची नोंद घ्यावी पूढील सभेत माहिती दयावी तसेच मेहरनगर भागात खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधलेली आहे या संदर्भात नगररचना विभागाकडून माहिती घेवून कार्य. अभियंता श्री. पानझडे यांनी आठ दिवसात चौकशी करून अहवाल सादर करावा.

श्री.संजय रिडलॉन :वार्डात कोणतेही विकास कामे होत नाही याची दखल घेणार की नाही.

श्री.सलीम खान :शहागंजमध्ये मिना बाजार भरवणार नाही का? मा.न्यायालयाचे काय आदेश आहेत,सभागृहाला माहिती दयावी.

मा.आयुक्त : पर्टीकुलर मिना बाजारच्या संदर्भात न्यायालयाचे आदेश नाही परंतू कोणत्याही रस्त्यावर बाजार भरवता येणार नाही असे आदेश आहे.मिना बाजार जेथे भरवला जातो तेथील जागा अग्निशमन दलाच्या दृष्टीने बरोबर नाही म्हणून एनओसी दिलेली नाही.मोठी पर्यायी जागा जसे अमखास मैदान आहे ती घ्यावी एनओसी देण्यास प्रशासन तयार आहे. किंवा इतर पर्यायी जागा शोधावी.

श्री.संजय सिरसाट :शहागंज भागात टप-या नसाव्यात म्हणून मा.न्यायालयाने आदेशीत केलेले आहे.

मा.आयुक्त :मिनाबाजार हा तात्पुरता भरविला जातो. टपरी बध्दल मा.न्यायालयाचे आदेश असतील काय आदेश आहे पुन्हा याबद्दल खात्री करून घेतली जाईल.

श्री.सलीम खान : कोणकोणत्या रस्त्याच्या संदर्भात मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहे याचा खुलासा वृत्तपत्राच्या माध्यमातून दयावे.जनतेला माहिती होईल. मिना बाजार शहागंज मध्येच भरवावा.

मा.आयुक्त :जागा सुचवावी अग्निशमन दलाच्या दृष्टीने योग्य जागा असेल तर परवानगी दिली जाईल.

मा.महापौर :मिना बाजार बद्दल मा.न्यायालयाचे काय आदेश आहे प्रशासन खूलासा करेलच मिनाबाजार भरवतांना त्या ठिकाणी कोणतीही दुर्घटना उद्‌भवल्यास जीवीत हानी होवू नये म्हणून प्रशासनाने सुचविलेले आहे. आमखास मैदान असेल किंवा रोषणगेटच्या बाजूला मोठया जागेवर मीना बाजार भरण्याचा निणर्य घेण्यात यावा.

श्री.मिलींद दाभाडे :ज्या भगवान गौतम बुध्दामूळे भारत देशाला संपूर्ण जगात ओळखतात. त्यांचा पूतळा उभारण्यासाठी महापालिकेसमोर बुध्दाच्या अनुयायास गेली अनेक दिवसापासून अंदोलन करावे लागत आहे.या वर्षीच्या अर्थसंकल्पात तरतूद असतांना प्रशासनाने कोणतीही तत्परता न दाखवता पुतळा करण्यासंदर्भात टेंडर काढले नाही. तसेच विदयापीठ गेट समोर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयासाठी जागा असतांना तसेच बजेट मध्ये तरतूद असतांना कार्यवाही केली नाही.दोन्ही पुतळयाचे टेंडर काढण्याचे आदेशीत करावे नसता पूढील सभा होवू देणार नाही.

अति.शहर अभियंता :भगवान गौतम बुध्दाचा पुतळा सिध्दार्थ उद्यानात उभारण्यासाठी प्रशासनाने यावर्षी बजेट मध्ये तरतूद केलेली आहे अंदाजपत्रक मंजूर झालेले आहे शासनाचे

कला संचालनालयाकडून मंजूरीसाठी १५ दिवसापूर्वीच पत्र पाठविलेले आहे. सोमवारी पुतळा खरेदीची निविदा काढण्यात येणार आहे. विदयापीठ गेट जे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयासाठी जागा देण्या संदर्भात विदयापीठाने एनओसी दिलेली आहे जो फॉरमेट होता तो भरून दिला विदयापिठाने शसनाकडे पाठविलेला आहे जागा ताब्यात दिलेली नाही शासनाकडून जागा मिळेल समोरील जागा देणार आहे त्यांचे प्लॅनींग झालेले आहे अंदाजत्रक झलेले आहे जागा ताब्यात मिळाली तर त्या संदर्भात लगेच निविदा काढल्या जातील.

श्री.संजय रिडलॉन :वार्डातील विकास कामाच्या अनेक संचिका चर्चा करावी म्हणून प्रलंबीत आहे. केव्हा मंजुर करणार आहे.

मा.आयुक्त :वेगवेगळया योजनेच्या निकषाप्रमाणे आयुक्तांना त्या संचिके बाबत लगेच निणर्य घेता येत नाही म्हणून चर्चा करावी नमूद केले जाते. पर्टीकुलर एकाच वार्डातील संचिकेत तसे केले जात नाही जेथे आवश्यकता भासली तेथेच लिहिले जाते.चर्चा करून त्यावर निणर्य घेतला जातो.

श्री.संजय रिडलॉन : माझ्या वार्डातील संपूर्ण संचिकेवर चर्चा करावी असे नमूद केलेले आहे.

श्री.देसरडा प्रशांत : चर्चा करावी असे नमूद करतांना तारीख टाकणे आवश्यक आहे संबधीत अधिकारी तात्काळ चर्चा करून मंजूरी घेतील. माहिती प्रमाणे प्रशासनानेच अधिकाऱ्यांना कानमंत्र दिला की काम स्लो करावे.

मा.आयुक्त :कामे स्लो करावी म्हणून प्रशासन सूचना देवू शकत नाही जेव्हा संचिकेवर चर्चा करण्याची गरज भासते तेंव्हाच लिहिले जाते. स.सदस्यांनी म्हटले की त्यांचे वार्डातील सर्वच संचिका चर्चा करावी म्हणून दिले याबद्दल चौकशी करून घेतली जाईल.

श्री.संजय रिडलॉन :वार्ड कार्यालय ड मध्ये माझ्या वार्डातील विकास कामाच्या सर्वच संचिकेवर चर्चा करावी असे दिले आहे.एक ही कामाचे टेंडर काढलेले नाही.दोन महिने संचिका तयार आहे कार्यवाही होत नाही.

सौ.कला बोरामणीकर :समर्थनगर येथील एका जागेच्या संदर्भात एका व्यक्तीने माझी जागा आहे म्हणून कोर्ट प्रकरण चालू केले त्यावर स्थगिती आणलेली आहे ५ वर्षापासून प्रकरण न्यायालयात प्रलंबीत आहे. वेळोवेळी माहिती घेतली असता अधिका-यांनी माहिती दिली नाही.दोन वर्षापूर्वी तेथे संरक्षित भिंतीचे काम चालू केले होते.सदर व्यक्ती ती जागा विक्री करणार आहे अशी माहिती मिळाली.

विधी सल्लागार :या जागेच्या प्रकरणाची सर्टीफाईड कॉपी मिळाली आहे महापालिकेच्या विरोधात निकाल लागलेला आहे.मा. उच्च न्यायालयात त्या विरूध्द प्रकरण दाखल करण्यासाठी पॅनलवरील वकील श्री.सोनवणे त्यांचेकडे हे प्रकरण दिलेले आहे.आठ दिवसात मॅटर दाखल करण्यात येईल.

सौ.कला बोरामणीकर :पॅनलवरील महापालिकेचे वकील वेळेवर हेरींगसाठी जात नाही अशी माहिती मिळालेली आहे त्यामूळे महापालिकेच्या विरोधात निकाल गेलेले आहे आता तरी चांगल्या प्रकारे मा.न्यायालयात प्रकरण हाताळावे व महापालिकेच्या बाजूने निकाल घ्यावा तसेच आजच्या वृत्तपत्रात बातमी आली केली स्पेकने घाशा गुंडाळला मालमत्ता अधिकारी त्यांना प्रोत्साहन देत आहे असे दिले. इमारत निरीक्षक कोणतेही काम करीत नाही सर्रासपणे शहरात अनधिकृत बांधकाम चालू आहे.अनेक रस्त्यावर वाळू खडी पडलेले दिसून येतील.आपण सर्वे करावा इमारत निरीक्षक यांना कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

श्री.वसंत नरवडे :कोरम नाही सभा लवकर संपवावी.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :माझ्या वार्डातील अतिक्रमण दोन दिवसात काढावे नसता मी उपोषणास बसणार आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे :पीरबाजार परीसरात महापालिकेचे मुत्री तोडली तेथे अतिक्रमण झालेले आहे नागरीकांना गॅस्ट्रो होत आहे वारवारं मागणी करून ही कार्यवाही होत नाही.सिडको भागात स्वेच्छतेचा ठेका दिला कामगारांना लोकांना तीन महिण्यापासून पगार नाही उपोषणास बसलेले आहे ठेकेदार दादागिरी करीत कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करतात म्हणून कर्मचाऱ्यांनी ठेकेदारावर पोलीसात गुन्हा दाखल केलेला असून प्रशासनाने या बाबतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. गरीबांवर अन्याय होत असेल तर अशा पध्दतीने ठेकेदारास कामे देण्याला अर्थ नाही.पाच कर्मचारीच काम करतात १० करीत असल्याचे दाखविले जाते.ठेकेदार कामगारांची पिळवणूक करीत असेल तर त्यांना ठेका देवू नये रद्द करावा.

मा.आयुक्त :पेमेन्ट करण्याची पध्दत अशी केली होती की त्यांनी वार्ड कार्यालयासमोर पगार करावयास पाहिजे यापूढे असे होणार नाही प्रशासनाकडून दखल घेतली जाईल.

मा.महापौर : पूढील आठवडयात पीरबाजार येथील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी.

सौ.रजनी जोशी : सभागृहात एखादया महत्वाच्या विषयावर चर्चा होते त्यावर निर्णय झाल्यानंतर कार्यवाही होणे अपेक्षीत असते परंतू तसे होत नाही.२४ तारखेला सिडको हडकोच्या विकास कामा संदर्भात बैठक घेतली होती त्यातून काय निष्पन्न झालेले आहे. डोअर टू डोअर कलेक्शन, ओला सुका कचरा, वेगवेगळा करणे, घंटा गाडी प्रत्येक घरासमोर जाईल, अशी संकल्पना होती. वार्डात औषध फवारणी, अदयाप झालेली नाही. पूढील बैठकीत औषध फवारणी तसेच स्वेच्छतेच्या बाबतीत चर्चा होवून निर्णय घ्यावा.माझ्या वार्डात अनधिकृतरित्या भाजी मंडई झालेली आहे प्रशासनाकडे पत्र ही दिलेले आहे अदयाप कार्यवाही केली नाही.

मा.आयुक्त :खुल्या जागेवर भाजी मंडई आहे मी पाहणी केली. लिगली काढून टाकावी लागेल दुसरा पर्याय नाही.

मा.महापौर : पाहणी करून एक महिण्याच्या आत कार्यवाही केली जाईल.

सौ.रजनी जोशी :वार्ड अधिका-या मार्फत विकास कामे होत नाही.प्रत्येक संचिकेवर चर्चा करावी म्हणून लिहिले जाते हे बरोबर नाही.वार्ड अधिकारी यांना एक लक्ष पर्यंतचे अधिकार देणार होते अदयाप दिले नाही जेणे करून तातडीचे काम वार्ड अधिकारी यांना करता आले पाहिजे.

मा.आयुक्त : आताच स.सदस्या सौ.जोशी मॅडम यांनी म्हटल्या प्रमाणे सर्व वार्ड अभियंता यांनी नोंद घ्यावी की जी तातडीने कामे करावी लागतात त्या सर्व कामाचे ॲटम रेट अंतिम करून घ्यावे.एजन्सी निश्चित करून घ्यावी जेंव्हा केंव्हा काम निघेल तेंव्हा ते तातडीने करावेत.

सौ.रजनी जोशी :१२ तारखेला घटस्थापना आहे त्या अगोदर रस्त्यावरील सर्व लाईट कसे लावता येतील याची दखल घ्यावी.

मा.आयुक्त : आता लगेच घटस्थापना येणार आहे त्यानंतर जे जे सण येणार आहे त्याची माहिती आज ही आपल्या समोर आहे त्या त्या सणाच्या अगोदर तशी वार्ड अभियंता यांनी कार्यवाही करावी.संबधीत अधिकारी यांना सूचना देण्यात येते की घटस्थापना येणार आहे लगेच टेंडर काढून पाच तारखेला जी जी महत्वाची कामे आहे ती करावीत.

श्री.वसंत नरवडे :साफसफाई तसेच ड्रेनेजचे खाजगी एजन्सीला काम दिले व्यवस्थित काम करीत नाही प्रशासनातील अधिकारी यांचे याकडे लक्ष नाही महापालिकेच्या कर्मचा-यांना पगार मात्र चालू आहे.महापालिकेत तीन उपआयुक्त कार्यरत आहे मा.आयुक्तांनी

त्यांचेकडे कामाचे वाटप करून दयावे त्यांना वार्डात व्हिजीट देण्याचे सक्ती करावी.वार्डात ज्या समस्या निर्माण होतात त्याबद्दलची तक्रार घेण्यास कुणी येत नाही.कोणत्या वार्डात काय कामे चालू आहे यांची प्रशासनाकडे कूठेच नोंद नाही.सिल्लेखाना ते पैठणगेट रस्त्यावर एका मोकळया जागेत मनपा टप-या जमा करीत असे. तो डेपो बंद झाला पैठणगेट जवळ पार्कीगचे महापालिका पैसे घेते तेथील मोकळया जागेवर लोक कचरा आणून टाकतात सकाळी पार्कीग धारकांना काम करता येत नाही.कचरा उचलण्याची क्षमता नसलेले लोक तेथे ठेवलेले आहे.एक कुंडी कायम कच-यांने भरलेली असते दुर्गंधी येते.पार्कीगवाला कचरा टाकू देत नाही लोक विचारतात कचरा कुठे टाकायचा दररोज वाद होतो तेथे भांडण उदभवून शहरात तणाव निर्माण होवू शकतो.त्यासाठी तेथील कचरा डेपोकडे लक्ष दयावे कचरा वेळेवर उचलण्याची दखल घ्यावी.

मा.महापौर :संबधीत अधिकारी स.सदस्यांनी स्वच्छतेच्या बाबतीत केलेल्या सुचनाची नोंद घेवून साफसफाईकडे लक्ष देण्याची गरज आहे. शहरात स्वच्छता राहिल यांची दखल प्रशासनाने घ्यावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभा
## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (४८)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ मधील नियम क्र.१(एच) आणि (आय) अन्वये

**दिनांक :- २१.०९.२००७**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ मधील नियम क्र.१ (क) अन्वये मा.महापौर डॉ.श्री.भागवत किसनराव कराड यांनी शनिवार दिनांक २९.०९.२००७ रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिका प्रशासकीय इमारतीतील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे आयोजीत केली आहे.

प्रायोजित सभेत निम्ननिर्दीष्ट विषय पत्रिका निर्णयाधिन आहे.

करिता विनंती की, प्रस्तावित सभेस निर्धारित वेळी उपनिर्दीष्ट ठिकाणी उपस्थित राहून सहकार्य करावे.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद

प्रशासकीय प्रस्ताव

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पित

सर्वसाधारण सभा
पुरवणी विषय पत्रिका

दिनांक :- २५.०९.२००७

(मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची 'ड' चे प्रकरण-२ आणि नियम-१ (ज) अन्वये)
शनिवार दिनांक २९.०९.२००७ रोजी आयोजित करण्यांत आलेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसाठी पुरवणी विषय पत्रिका पाठवित आहोत.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद

स.सदस्यांचे प्रस्ताव

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**सर्वसाधारण सभा**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (४८)**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" चे प्रकरण -२ मधील नियम क्र.१(एच) आणि (आय) अन्वये

दिनांक :- २७.०९.२००७

मा.महापौर डॉ.भागवत किसनराव कराड यांनी शनिवार दिनांक २९.०९.२००७ रोजी दुपारी ३.०० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिका प्रशासकीय इमारतीतील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे आयोजीत केली आहे.

प्रायोजीत सभेत निम्ननिर्दीष्ट विषय पत्रिका निर्णयाधिन आहे.

विषय क्र. ०१ :

मौजे मिटमिटा येथील गट क्रमांक १११,११४,११७ मधील जमीनीतील १५ मीटर व ३० मीटर रुंद विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्र भूसंपादन करणे.

विषय क्र. ०२ :

मनपाच्या टाऊन हॉल या इमारतीचा वापर "पालिका कला दालन" म्हणून करणे व टाऊन हॉलसाठी सल्लागार समिती स्थापन करणे.

पुरवणी विषय

विषय क्र.१ :

वार्ड क्रमांक ११ येथील इमारत देखभाल दुरुस्तीसाठी ठेवण्यात आलेली उर्वरीत रक्कम वार्डातील विविध कामासाठी खर्च करणे.

सुचक : सौ.लक्ष्मी शंकर आशन्ना अनुमोदक : श्री.सय्यद खुसरो बु-हानोद्दीन

विषय क्र.२ :

अर्थसंकल्पातील प्रभाग क्र ३० करीता असलेल्या कामांचे लेखाशिर्ष बदलणे संबंधी.

सुचक : सौ.शोभा मिटकर अनुमोदक : श्री.विजय खुडे

विषय क्र. ३ :

अर्थसंकल्पात पान क्र.W २३१ व अ.क्र. मध्ये वार्ड क्र.१८ पवननगर अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे करीता असलेली तरतूद इतर कामासाठी वळती करणे.

सुचक : श्री.प्रकाश अत्तरदे अनुमोदक : श्री.सीताराम सुरे

विषय क्र. ४ :

अर्थसंकल्पातील पान क्र.W-२०९ वरील तरतूदीचे इतर कामासाठी लेखाशिर्ष बदलणे संबंधी.

सुचक : श्री.संजय जोशी,श्री.भाऊसाहेब ताठे अनुमोदक : श्री.कैलास गायकवाड

विषय क्र. ५ :

सर्वे क्र.८ शहानुरवाडी, सर्व्हे क्र.६१ गारखेडा यातील आरक्षण क्र.२६६/ब उद्यानाकरीता आरक्षित असलेली सर्व जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये वगळून निवासी भागात सामील करण्याबाबत.

सुचक : ०१. श्री.रविकांत गवळी, ०२.सौ.अंजली कोंडेकर

अनुमोदक : ०१.श्री.वसंत नरवडे पाटील, ०२.श्री.सतिष कटकटे, ०३.श्री.रविंद्र गांगे

स्वाक्षरीत/- स्वाक्षरीत/-

**नगर सचिव** **महापौर**

महानगरपालिका औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**//सत्यप्रत//**